म. ग्रं. सं. ठाणें
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक
सन
पुस्तकाचें नांव

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
सं. क्र. ६७५

रावणवध

नाटक

# RAVAN VADHA NATAKA

# रावणवध नाटक.

हें नवीन पुस्तक

रावजी बाळकृष्ण लेले यांनीं तयार करून.

नारोआपाजीगोडबोले यांस बक्षिस

दिलें.

तें त्यांनीं

पुणें पेठ सदाशीव येथें आपले "वृत्तप्रसारक"

छापखान्यांत छापून

प्रसिद्ध केलें.

---

आवृत्ती दुसरी.

---

या ग्रंथावरून सन १८४७ चा आक्ट २० व १८६७ चा २५

प्रमाणें सर्व प्रकारें ग्रंथ स्वामित्वाचा हक्क नारोआपाजी-

गोडबोले यांनीं आपले कडे-

ठेविला आहे.

किंमत ८ आणें.

॥ श्री ॥

# रावणवध नाटक.

प्रकृत ग्रंथ कर्त्यानें मंगलाचरण

## आर्या.

॥ श्रीसांब नंदनानें, आनंदें वंदनार्थ जोडि करां॥
॥ त्याच्या पदानुकंपें, कामादिक षडरिबाधनी नरां १॥

## साकी.

॥ श्रीराजदीशा पूर्णपरेशा संकट हरणा येई ॥
॥ वीर दशानन कंदना वर्णन करिन असा वर देई ॥१॥

## श्लोक.

॥ श्री शारदे भगवती तव पाद पद्मा ॥ वंदूनि मी स्तवितसें
॥ दिन रात्रि पद्मा ॥ दीना सदैव निमनी कविता रसाला ॥ हो
॥ तील मल्करिं अशा भज देवराला ॥ ३॥

॥ श्रीरामा, रविवंश भूषण विभो, राजानकी जीवना ॥ कौसल्यात्मज रा-
॥ घवा, क्रूरपते सर्वोत्तमा, सन्मना ॥ वादेकीं भवताप शांति करितां, त्वत्पाद्वं-
॥ दूनियां ॥ कीर्त्ती गावि तुझी रसाळ कवनी, पावोपरी तीजया ॥ ४ ॥

( सूत्रधार प्रवेश करितो )

सूत्रधार:-" करद्वय जोडून " हे रसज्ञ सभाजनहो, जगद्वंद्य जो भक्तवत्सल भगवान् अयोध्याधीश श्रीराम यानें, त्याची स्त्री जी जगन्माता सीता तिलें महत्पराक्रमी लंकाधीश रावणानें कापट्य करून चोरून नेलें; म्हणून त्याशीं अघोर युद्धप्रसंग करून त्यास या विनाशी मृन्मय देहांतून मुक्त केलें, तो लीला प्रकार अत्युत्तम रमणीय असून विशेषतः पारमार्थिक ज्ञान दर्शक ही आहे; तस्मात तो सर्वांनीं कृपा करून एकाग्र चित्तें अवलोकावा ( इतक्यांत )

---

१ पुत्र. २ चरणकृपेनें. ३ सहा वैरी. ४ युद्धास. ५ लक्ष्मी.

# प्रस्तावना

श्री शंकर पदभक्त जो श्रीधर नामाख्य प्रसिद्ध कविवर्य त्यानें शिव लीलामृत, रुक्मिणी स्वयंवर, हरिविजय, रामविजय, इत्याद्यनेक ग्रंथ परम रसाळ असे ओंवी बद्ध केले आहेत; त्यापैकीं रामविजय ग्रंथांतील ३३वा व ३४वा अध्याय आधार धरून मी हें "रावणवध" नांवाचें नवीन नाटक जन मन रंजन सेवाप्राप्त्यर्थ केलें आहे. यांत शृंगार, वीर, करुणा इत्यादीक रस यथाशक्ती साधण्याचा प्रयत्न कसा केला आहे हें पूर्ण ग्रंथ अवलोकन केला असतां सूज्ञ वाचकांचे लक्षांत येईल.

प्रकृत ग्रंथ कर्त्यास असावी तशी कविताशक्ती नाहीं; परंतु ती श्रीजगदंब कृपेनें यत्नांतीं भक्तिभावानुसारें वृद्धिंगत होईल अशी पूर्ण आशा आहे.

सूज्ञ जनांनीं दोषांकडे दृष्टी न देतां गुणांश गृहण करावा, अशी त्यांस आदर पूर्वक प्रार्थना आहे.

या ग्रंथांतील कवितेंत आलेल्या कठिण शब्दांवर अंक घालून त्यांचा अर्थ पृष्ठांचेखालीं टिपेंत स्पष्ट केला आहे.

ग्रंथकर्ता.

स्कूल मास्तर वांमोरी ता० राहूरी.

विदुषक:- (रंगीं येऊन) हे भागवंता आतां तूं जो रसाळ खेळ करणार त्याचें नांव तरीं काय?

सूत्रधार:- अहाहा ही व्यक्ति आली काय॥ नमोनमः यावें, मारिषा मीं दशमुखी रावणवध या नांवांचें नाटक करणार आहें जानर सत्वर पात्रांची तयारी कर.

विदुषक:- (पत्रावळ मांडून) हँ वाटा पाहूं कशी "दशमी खिरीवाणी" लागते तां॥ यास काय नाटक म्हणावें काय? भलतेंच बेटें, वाहवारे बहादरा नाटककारा, तूं तरी आपला खुप चैनी रामच दिसतोस.

सूत्रधार:- वारे वः कायतरी शुलाने कान॥ सांगावें एकतर ऐकतो दोन आणि करतो भलतेंच, अरे भल्या गृहस्था विदुषका, नीट ऐक "रावणवध नाटक" करावयाचें आहे, समजलास कीं, कां मुष्टिमोदकाची तयारी करूं.

विदुषक:- हँ हँ सूत्रधार बुवा, अशा मोदकाचें मला पथ्य आहे, करितां मला ते नकोत तुमचे तुम्हींच खा, अहो आलीकडे या हिरोबाच्या कानोबावर बहिराच्याची स्वारी फार प्रसन्न आहे म्हणूनच असें अक्षरतें ऐकूं येऊन कधीं कधीं अर्थाचा अनर्थ सहज होतो, पण रागाऊं नकां हो, असो भावी कृत्यांत अशीं संकटें प्राप्त नव्हावीं, म्हणून तुम्ही अष्ट सिद्धी नायक जो गणपती त्याची भक्तिपुरःसर प्रार्थना करा.

सूत्रधार:- वहाव्वा॥ मुलगा तर दाणा खराच; परंतु प्रस्तुत त्यानें जें सांगितलें तें मान्य करणें श्लाघ्य होय. (गणपतीचें स्तवन करितो.)

## साकी

निजजनजनका[1] गुणगणगणेशा[3] निगमागमा[4] अभंगा॥
त्वांनें कामनासिद्ध[5] करूनि द्या अभयप्रद पदसंगा॥५॥
वक्त्रांबुज[6] नव चुंबुनि शंभू भुलला स्फुरसा बोला॥
निर्गुण[8] असतां सगुण[9] होउनी दाविशि भक्तांलीला॥६॥
आर्या:- दिनमणि[10] भांपरि[11] तंव तनु॥ नीतें वर्णूं शकेन मी सत्य॥

१ आपले २ समुदाय ३ गणाध्यक्ष ४ वेदालाही अज्ञात ५ मन कामना ६ मुख कमल ७ गोड ८ निराकार ९ साकार १० सूर्य ११ कांति.

कुंक्षीं मेरू घेउनि ॥ करितकशी नी पिपीलिका नृत्य ॥ ७॥ ५॥

श्लोक.

रातोत्पलासमवपू सकुमार फार ॥ केलाभ गौर जणु ओंबुनि कंठि हार॥ आरक्त साजत उटी करि अंकुशानें ॥ निर्मूल आधि अटवी स्वपराक्रमानें ॥ ८॥ ५॥

गणपती:- हे नाटकाचार्या तूं परम रसाळ अशा स्वर गायनें करून किमर्थ माझें स्तवन करितोस? हें कथन कर.

सूत्रधार:- (वंदन करून) रणरंगधीर श्रीरामानें दशवदनासीं रण युद्ध केलें, तो लीलाप्रकार या रंगभूमीवर जनमन रंजन सेवार्थ करावयाचें योजिलें आहे; आपल्या वर प्रसादें करून हें कार्य निर्विघ्न सिद्धिप्रत पावावें.

गणपती:- वत्सा तुझी ही मनकामना सिद्धीस जाईल; परंतु नाटकपात्रां करवीं प्रसंगानुरूप वाग्विलास यथा तथ्य व्हावा, म्हणून त्वां श्री शारदेची स्तुती करावी. आतां मी स्वस्थानाप्रत गमन करतों.

सूत्रधार:- (सरस्वतीचें स्तवन करितो.)

श्लोक.

नवपदास विशारद शारदा ॥ नमितनें वरदान भलें सदां सदय होउनि दे मलास्वनां ॥ सतत हें किं असो मनिनित्र्नता ॥ जलजनाभसुता तु सरस्वती ॥ करिशि सत्य मुक्यांस बृहस्पती ॥ नर असे नयनांध सुखीं जरी ॥ नव कृपा करिस्या सहि जोहरी ॥ १०॥

श्लोक.

॥ विवेका हंसाच्यावरि अचलनें आसून निकें ॥
॥ तुझें साजे त्यानें स्मरण करितां हा भव चुके ॥
॥ शरीरातें याची जरि हि उपमा कांचन नरी ॥ दिसे
॥ नीवेगुण्यानवपद रूपासाचवितरी ॥ ११ ॥

१ कासेंन २ पर्वत विशेष. ३ मुंगी ४ रक्त वर्ण कमळ ५ शरीर ६ समुदाय ७ पीडा ८ अरण्य ९ हाती १० सरस्वती ११ ब्रम्हदेव १२ कन्या १३ रत्नपारखी १४ विचार रूप हंसाच्या १५ चांगलें १६ संसार १७ सोनें १८ कमीपणा १९ रात्री.

आर्या.

हे विधिनंदिनि संतत ॥ कविहृत्कासारिं नूं असे भ्रमरी
तव पदशरणागत मी ॥ येऊं दे गे कृपोब्धिची लहरी ॥ १२

श्लोक.

आंदासस्कंधा रसनाग्रभागीं ॥ दासासठेवी परमानुरागीं ॥
याठीशिराही समयीं तु जागी ॥ चित्तीं अणी नीतव पादयोगीं ॥ १३

सरस्वती :- अरे हे भारता, परम सुस्वर गायनें करून किमर्थ माझी स्तुती करितोस तें सत्वर सांग.

सूत्रधार :- ( अभिवंदन करून ) हे माते श्रीशारदे, या दासानें या रमणीय स्थानीं दशावदन कदन नामधेय नाटकास आरंभ केला आहे तर मज सहवर्तमान सर्व नाटक पात्रांस रसास्वाद प्रासंगिक संभाषण करतां येईल असा आपला वरप्रसाद असावा.

सरस्वती :- हे सूत्रधारा, मी प्रमोदितांत करणें करून त्वदीच्छा परिपूर्ण करीन वत्सा त्वां उत्कंठित कार्यास सत्वर आरंभ करावा, आतां मी जगदुत्पादक जो मत्पिता त्याच्या मंदिराप्रत गमन करितें ( जाते )

प्रवेश १ ला.

स्थल

सुवेलाचल पर्वत

पात्रें.

श्रीराम ........................ सीतापती.
बिभीषण ........................ ( रामभक्त रावणानुज.
रावण ........................ लंकापती.
मंदोदरी ........................ रावणाची पट्टराणी
शर्मा ........................ बिभीषणाची कांता.
नलनीलादि कपिगण ........................ रामाची वानरसेना.
[illegible] ........................ रावणाचा प्रधान.

१ [illegible] २ हृदयकमलीं ३ करुणासमुद्राची ४ वसतीस्थान ५ जिव्हाग्रभागीं ६ परमप्रीती



बिभीषण:- ( वंदन करून ) हे भक्तकामकल्पद्रुमा श्रीरामचंद्रा दासाची वि-
नंती श्रवण करावी.

साकी.

लंकानाथें हवनें मांडिलें गुप्तरूपें विवरांत
पूर्णस्यंदन निघेल पडतां पूर्णाहुत अग्नींत ॥ १४ ॥

आहुतीचे परिमळ सुटले आहेत नभमंडळ धूम्रानें पिंगटून गेलें आहे आणि अग्नीतून सबळसा दिव्य रथ अर्धा बाहेर निघाला आहे. यास्तव तेथून पूर्णाहुतीच्या पूर्वीच रावण उठला म्हणजे बरें. कारण त्यापासून भावी कल्यास अपाय होणार आहे असें मला वाटतें.

राम:- अरे परम भक्ता, बिभीषणा तूं जें कथन केलेंस तें सर्व खरें आहे परंतु.

---

१ रावणानें २ यज्ञ ३ रथ ४ पूर्णाहुती

नल:- हे असुर दमना नवमेघःशामा, रामा, मनुष्यानें ठायीं किमपी चिंता करूनये मी दश सहस्र वानर गणासह वर्तमान गरुड वेगवत् आकाशपंथें लंकेंत जाऊन त्या दुष्ट रावणाच्या यज्ञाचा विध्वंस करून येतों वंदन करून कपिगण लंकेत जातात आणि असें करतात.

चामर वृत्त.

शोधिती दशाननास ते कपी घरोघरीं ॥
सावकाश राक्षसांस ताडिती परोपरी ॥
बोलती तयांस कीं दशास्य दाखवा चला ॥
दाविखूण गुप्त त्यांस ती विभीषणाबला ॥१५॥

गंधमादन:- अरे जांबुवंता, पहा त्या नगर दुर्गाखालीं प्रचंड गुहेच्या द्वारीं महान विशाल शीला ठेवून आंत तो दुराचारी महा कपटी रावण बसला आहे असें दिसते तर चला आपण तेथें जाऊं (सर्व वानर जातात.)

द्वारपालक राक्षस:- अरे मर्कटांनों काय गडबड मांडिली आहे? आल्या वाटेनें सत्वर परत जा नाहीं पेक्षां निरर्थक माणास मुकाल.

वानर:- अरे दुष्टांनों उगीच वल्गना करून कां आपल्या जिवास भिऊन पलायन करा (ते अंगावर चाल करितात असें पाहून) हो तरमग तुमचे आयुष्याची दोरी तुटली असें खचीत समजा (असें करतात.)

साकी.

पळन लागतां सर्वहि वधिले दुष्ट असे कर्बुर
शिळेस फोडुनि आंत शिरला पराक्रमी कपिभार ॥१६

(आंत पहातात तों असें दिसतें) श्लोक.

सांबाळया देखनि ते प्रचंड ॥ त्याच्यापुढें प्रज्वल होमकुंड
मांडीयलें आहुनि टाकि त्यांत ॥ लंकापती चित्त करोनि शांत ॥१७

चामर वृत्त.

॥ रक्तमद्यमांसढीग पर्वतापरी जियें ॥

१ रावणास २ वानर ३ त्या राक्षसांस ४ रावण ५ बिभीषणाची बायको ६ राक्षस ७ शिवालयास ८ पेटलेलें

दीसती असंख्य त्या समीप बैसला तिथें ॥
वज्रआसनास घालुनी तयावरी महा ॥
दुष्टरावणाख्य जास आसती शिरें दहा ॥१८॥

पहा ही नरांचीं अगणित शिरें येथें पडलीं आहेत आणि हा रक्तपाधीश महा गुंड दश मुंड प्रचंड होमकुंड प्रज्वलित करून थंड बसला आहे ? तर आतां आपण वितंड मांडून हीं यज्ञपात्रें विखंड करून असें करूं कीं;

श्लोक.

फोडून टाकूं मख भाजनें हीं ॥ घालूं बहू मातिमुखांत दाहीं
पाषाण फेकूं हवनालयांत ॥ ऐशी करूं येथ विचित्रमात ॥१९

अरे अशी धुमाळचक्री केली असतां ही रावण जागृत होत नाहीं काय ?
( चमत्कार करूं लागतात. )

श्लोक.

कोणी नाचति मस्तकीं दणदणा केंसां बहू ओढिती
कोणी कर्ण धरोनि लात बुकिनीं वक्षस्थळा ताडिती ॥
कोणी लघ्विकरी धुळीस उधळी त्याच्या शरीरावरी
ऐसा तो कपिभार त्यास्थळि परी जागा न झाला तरी ॥२०॥

काय सांगावें या धटिंगणाला तर कोणत्याही गोष्टीची घम्मच नाहीं हा अगडबंब बंब्या कोणत्या व्यतिपातावर जन्मला कोण जाणें !!! अहो, ह्याला काळनिद्रा तर लागली नाहींना ; अरे हा आपलातर एक घमंडी नाथच दिसतो ( इतक्यांत )

जांबुवंत:- हे नल नीलादीकहो, मित्रहो थांबा मला एक बरीच युक्ती सूचली आहे तेणें करून हें भक्कम माप कांहीं उलथें पालथें झालें तर होईल. ( मग- असें करतात. )

सार्की.

दशवक्त्रांगना चरिती मयजा लोटियली अनिवार
निरी कंचुकी अलंकार ही सर्वचि केले चूर ॥ २१॥

---

१ वळकट बैठक २ यज्ञ- ३ भांडीं. ४ यज्ञकुंडांत. ५ रावणाच्या आंगावर ६ मंदोदरी. ७ चोळी.

मंदोदरी:- (उच्च स्वरानें) अहो प्राणनाथ, तुमच्या ह्या अघोर अनुष्ठानांस आग लागो, पहा मला ह्या मेल्या करंट्या दुष्ट मांकडांनीं नग्न करून माझी कशी विटंबना मांडली आहे! तुम्हांस या अपकीर्तीची लाज वाटूं नये काय? जळलें हें मेलें ध्यान॥ बाई माझा सर्वस्वी अपमान झाला तरी आमच्या यरचांचें अजून ध्यानच होत आहे. अहो पहा या यज्ञ पात्रांची आणि होम कुंडाची काय दुर्दशा झाली आहे ती? (फार मोठ्यानें) (प्राणपती, प्राणपती, डोळे उघडा डोळे उघडा, (असें म्हणतांच रावण रावजी मोठ्या क्रोधानें उठतात.)

रावण:- (चोंहींकडे पाहून) अरे दुष्ट मर्कटांनों, आं यज्ञ विध्वंस केलात का? हं, बरें, तर मी तुम्हांस एका थापडी सरसें मक्षिके प्रमाणें चिरडून टाकतों.

श्लोक.

॥ तैंनील ही फ़गल अंगद मुष्टि घालें ॥
॥ झोडी पदीं इतर आपटि वानरांतें ॥
॥ शार्दूल देखुनि जसे मृग भार जाती ॥
॥ वेगें पळोनि तसले कपि धांवताती॥२२॥

वानरगण:- (सत्वर रामाकडे येऊन वंदन करून म्हणतात)

ओंवी

॥आतां उठला रावण ॥ क्रोधें युद्धार्थ दारुण॥
॥ चमू घेवूनि निर्वाण॥ येत सत्वर जाणपा॥२३॥

राम:- (वीर मुद्रेनें) शाबास शाबास तुमच्या सारखे पराक्रमी वीर कपि गण मला साह्य असतां कोणतीच चिंता करणे नलगे (कोदंड उचलून) पहा तो दुष्ट वंचक सन्मुख येतांच राम बाणाचें सामर्थ्य कायतें त्यास दाखवितों. अरे आतां त्या मयासूर कन्यकेचें समग्र सौभाग्य नष्टत्व पावलेंच असें समजा. (इकडे.)

रावण:- आलिंगन देऊन) अंगप्रिय सखे आतां ही रत्न कनकादि युक्त भूषणें व बहु मोला दिल्यावरें सत्वर परिधान करून स्वस्थानाप्रत गमन कर. अगो

---

१ बुद्धीनें २ सिंह ३ हरिणादि. ४ सैन्य ५ अतिशयीत.

प्रियतमे, प्राक्तन भोग कधीं चुकत नाहीं; तस्मात् किंचित्ही कष्टी होऊं नको, आज मीं त्या अनिवार्य शत्रूंचीं शिरें छेदीन तरच राहीन; नाहीं पेक्षां तुमची आमची ही शेवटची भेट असें पक्कें समज.

मंदोदरी— ( सचिंत मुद्रेनें ) अहो प्राणनाथ जो परात्पर भगवान् साक्षात् पूर्णपरब्रम्ह श्रीराम त्याशीं आपण निरर्थक द्रोह केल्यामुळें आप्तहानी, यशहानी, द्रव्य हानी इत्यादि अनेक विपत्ती प्राप्त झाल्या तथापी आपला दुष्ट हट्ट न सोडितां पुनरपि युद्धाप्रत जावयाची तयारी करीत अहां परंतु याची पुढें मला धडगती दिसत नाहीं. हें चिन्ह सर्व प्रकारें धुळीस मिळण्याचें दिसतें, अहो, एतद्विषयीं बिभीषण भाउजीनी ही पूर्वी बहुत प्रकारें आपल्यास यथा योग्य विनंती केली; परंतु महाराजांनीं तिकडे लक्ष दिलेंच नाहीं " देव देतो आणि कर्म नेतें " हें वाक्य खरेंच आहे, पहा शिव प्रसादें करून आपल्याला ही अतुल संतती व संपत्ती प्राप्त झाली; आणि तिचा उपभोग चौदा चौकड्या युगें आपण घेत असून तिचा परिणाम गोड व्हावा काय? अहो जागृत असून निद्रावस्थेचें सोंग घ्याल तर त्यास मी काय उपाय करूं वरें? खरेंच बाई, मला मेलें आतां कांहींच सुचत नाहीं, आग बाई, हिताहित ज्ञान असून जर आपला हेका व वेडेपणा कोणी सोडणार नाहीं तर तेथें आम्ही बायकांनीं काय करावें? कोणी ऐकिलें तर बाई सांगण्याचा उपयोग नाहीतर मेलें दिसतेंच आहे; पहा, पहा; त्या भक्तवत्सल भगवंताशीं अनिर्वाच्य हाडवैर करून त्यास जरी अनुपमेय पीडा दिली आहे तथापि अद्याप त्याच्या त्या भवभय नाशक चरण कमला प्रत शरण गेलें तर तो सर्व साक्षी व सर्व समदृष्टी त्रिजगदाधिपती श्रीराम ह्या विनाशी विस्तीर्ण भवांबुधींत मज्जित होऊं देणार नाहीं असें वाटतें, सारांश स्वामींनीं दूरदृष्टी देऊन अद्यापतरीं आपलें स्वात्महित करून घ्यावें ( हात जोडिते )

रावण— ( रोषानें ) अगे व्यर्थ ब्रम्हज्ञान बकूं नको, तातू आजास शिकवितोस काय? मला कांहींच कां कळत नसेल? असो आतां विलंब करून उपयोग नाहीं तूं आपली येथून लवकर जा, चल नीघ.

मंदोदरी— अहो एक तरी करा कीं,

रावण— कां उगीच पिर पिर लाउली आहेस? जा, जा, लौकर, मी त्रिजगीं अ-

पलें नांव राहील असेंच कृत्य करीन, समजलीस, तुजसारिख्या चतुर स्त्रीनें अशा महत्कृत्यास आडवें येणें अश्लाघ्य होय, (निरुपाय जाणून ती जाते.)

रावण:- (सभेंत येऊन) अरे हे प्रधान श्रेष्ठा, शूरहस्ती, आतां सत्वर सेनेची तयारी करावी. त्या दुष्ट मानव शत्रूंनीं मला अतोनात त्रास दिल्या मुळें माझ्या तळची आग मस्तकांत शिरली आहे (पायआदळून) परंतु मत्भुज पराक्रम त्यांस माहीत नाहीं कीं काय? बरें तर तें सौख्य त्यांस दाखविलेंच पाहिजे.

शूरहस्ती:- (सेनेची तयारी करून) राजाधिराज महाराज, मीं आपल्या आज्ञेनुरूप सर्व सेनेची कडी कोट तयारी केली आहे, ती अवलोकन करावी.

### श्लोक.

भेरी[१]दुंदुभिज्या भयंकर अशा, कर्णे तुतारे तसे
धोंधोंधाडि धडाडि वाजनि बहू सेना कशी ती दिसे
अंकीपायदळांस येत गणिना नाहींच हेमोजितां
वाजी[२] वारणे[३] सादि[४] संध[५] सरसे चौताळती पाहतां॥२४॥

लंकापती नाना प्रकारचे दिव्य रथ घेतले आहेत, पुढें बंदीजन गर्जना करीत आहेत आतां विलंब न करतां चलावयाचेंच असेल तर या महान दिव्यस्यंदनावर आरोहण करावें.

रावण:- (राजचिन्हासहित रथारूढ होत्सातां बिभीषणास उद्देशून म्हणतो) अरे मी तर राक्षसकुल संप्रदायानुसारच करणार. तुला कितुज्यासा असें विपरीत केल्यानें काय राज्य पद मास होणार आहे करतर तूंच राज्य कर.

### साकी.

घडघडघडघड सत्वरतें रथजातां मनांत येई।
रावण वरजणुं मुक्ति नोवरी पर्णा[६]यारणिं जाई॥२५॥

---

## प्रवेश २रा.

स्थल

---

१ वाद्य विशेष. २ अश्व. ३ हत्ती. ४ घोडेस्वार. ५ समुदाय. ६ वरावयास

## रणभूमी

### पात्रें

| | | | |
|---|---|---|---|
| श्रीराम | दशरथनंदन. | रावण | लंकाधीश. |
| बिभीषण | रावणानुज. | मंदोदरी | रावणाचीस्त्री. |
| हनुमानादि कपिगण | राम सेना | इंद्र. | देवांचाराजा. |
| बृहस्पती | वाचस्पतीदेवगुरु. | मातली | इंद्राचा सारथी. |



वानर— (ससैन्य रावण रणांगणी येतांच) अरे दुष्टा, राक्षस कुलाधमा, क्रूर हृदया, अद्याप तुझी घमंड मोडली नाहीं काय? युद्धाची धमक दाखवितोस काय? अरे पहा हें तुझें सैन्य आमच्यावर चौताळून येत आहे परंतु सावध रहा.

आर्या.

कपिनगपादपदेती झोकुनि[१]त्या यातुच्या[२]वरी घोर

१ रक्ष. २ राक्षसांवर.

झालेनेणेंजर्जर ; लागे त्यांच्या जिवास हा घोर ॥२६॥

रावण— अरे अशाचेष्टेनें काय व्हावयाचें आहे? एका क्षणार्धांत तुमचा चुराडा उडवीन गरूडापुढें सर्पाचा पराक्रम चालेल काय? तर अवलोकन करा.

दशाशार चूर्ण

देखुनि मद्भुजविक्रम घेउनि असफैकपिसमस्तजादूर ॥२७

(असें रोकतांच रामचंद्र पुढें सरसाऊन) अरे तस्करा, शतमूर्खा तूं निरर्थक आपला कुलक्षय करून घेत आहेस. संतती, संपत्ती व विद्या, धन याचा तुला यथासांग उपभोग घेतां येत नाहीं, अद्याप तरीं हें अज्ञानत्व सोड, आतां हा डोळ्यावरचा धूर जाऊं दे नाहींपेक्षां नवमाण हतें माझे शर सोसावयास समरंगणी सिद्ध हो.

रावण— (रोषानें) अरे मानवाच्या काट्या, श्रवण कर.

जरि पामरा तुला रे वदती कीं रामचंद्र लोकांत
तरि मी राहुदशानन ग्रासिन आजी समग्र समरांत ॥२८
समरीं स्फुटतां मत्शर मेरूमांदार होतिरे चूर्ण ॥
तूं सकुमार कसेनें सोसिशि याचा विवेक करिपूर्ण ॥२९
पश्चिम दिशेस जाणा कीं जरि हीनो उदय पावला तरणी
प्राप्त न होईल तरि ती सीतासुंदर तुला नवी तरणी ॥३०

कदाचित् मुंगी आपल्या मस्तकीं धरणी धारण करील. सिंव्ह जंबुकास भिऊन गज मस्तकींचीं मौक्तिकें त्यास देईल. मक्षिकेच्या पक्षवातें करून मेरूपर्वत उडून जाईल अशी ही विपरीत गोष्ट कालगतीनें एकवार होऊं शकेल; परंतु ती सुंदर व सकुमार सीतासती कितीही केलें तरीं तुला पुनरपि प्राप्त होणार नाहीं. पहा.

१ पर्वत. २ पराक्रम. ३ बाण. ४ राहुनामक ग्रह. ५ युद्धांत. ६ माझे बाण. ७ पर्वत विशेष. ८ सूर्य. ९ तरुण वयस्क.

आर्या.

गीळिल पतंग अनला[1] येईल सर्पास शरण ही गरुड ॥
परि तुज मिळे न सीता तीच्यासाठीं सदां असा चिरड ॥ ३१

राम- (संतप्त होऊन) अरे कां उगीच वल्गना करतोस? जसें चंडवातें प्रचंड वृक्ष भंग होत्साते धरणीवर धाडकन् धाडकन् आपटतात, तसें तुझें हें अवजड शरीर मी एका तीव्र बाणेंकरून या भूतलावर लोळवीन. हो सावध रहा, हा शर सुटला पहा; (चाप टणत्कार होतो)

श्लोक.

सोडीयलानें शर काळदंड झाला टणत्कार महाप्रचंड
मांडीयलें घोर रणीं वितंड दुष्टासि होतोचि उदंड दंड ॥ ३२

विदुषक- (सकंप होऊन) अरे सूत्रधारा, नको बाबा हें नाटक अरे हें काय? घन चक्र मांडिलें आहे काय? या उभयतां राम रावणांच्या भोंवया धनुष्याकार चढून गेल्या आहेत, नेत्र आरक्त झाले आहेत; बाहू स्फुरण पावताहेत परस्परांवर मेघवत् तीव्रबाणवृष्टी चालली आहे, रण वाद्याच्या अघोर नादानें हें समरंगाण दणदणून गेलें आहे, धरणी तर थरथरां कांपतच आहे! असें वाटतें, उभयतांच्या हस्तांतील सतेज मुद्रिका जणु विद्युत् चापल्या वत् चम् चम् करून राहिल्या आहेत, आणि हा आगड बंब धुताड्या आपली भयंकर बत्तिशी बाहेर काढून व अक्राळ विक्राळ ओबड धोबड थोबाड पसरून जाभाडांतून कुवा, क्वा इत्यादिक शब्द मेघ गर्जनेचें परी करीत आहे. मी सकंप झालों आहें कांहीं पूर्व संचित पदरीं असेल तरच खचित वांचेन, नाहीं तर आपली असमानी सुलतानीं बनलीच आहे. या प्रसंगीं त्या गबाळ भरजीनें हीं मला धैर्य देण्याची अबाळ मांडलीसें, दिसतें, असो काळच तसा आहे.

सूत्रधार- मोठे बाजीराव बेटे ॥ धैर्य सोडावयास काय शस्त्र पशू मागें लागले आहेत काय? क्षणभर छाती मोठी करून मौज तर पहा म्हणजे सर्व होसफिटेल. आतांच कोण कोणाची मोडशी जिरवितो किंवा अठरा मासे चांदी बनाव-

---

१ दीपक ज्योतीला.

तो हें समजून येईल. अरे एकीकडे हा हें पहा काय अरिष्ट आलें आहे तें (एकीकडे होतो.)

रावण–(भुजंगास्त्राचा प्रयोग करून) ऑं अरे दुष्टा, मानवा, आतां हे काळसर्प तुझा व तुझ्या वानर सेनेचा क्षणार्धांत नाश करतील.

आर्या.

कपिकटकावर[1] येती वेगें समुदाय दुष्ट सर्पांचे ॥
दंशिती त्या कडकडुनी मानिति भयसर्वहीविरवाराचें ३३

राम– अरे राक्षसाधमा, निर्लज्ज शिरोमणें यांत रे काय केलेंस ? (गरुडास्त्र सोडितो.)

साकी

व्योम[2] धराला आणिऊर्वीला[3] येती जे फोडून ॥
सुपर्ण[4] अगणित सकलां सर्पां भक्षिति बहु कोपून ३४

रावण– दुष्टा हा काळ पर्यंत मी तुझी हयगयच केली; परंतु पहा, पहा, पहा, आतां हें सर्व जाळून भस्म करतो (जातवेदास्त्र[5] सोडितो.)

राम– यांत तर कांहींच अर्थ नाहीं, तुला युद्धाची रीती काय माहीत? अभक्ष भक्षण करावें आणि मृतप्राय निजून रहावें हेंच तुझें काम; परंतु अव लोकन कर (मेघास्त्र सोडितो)

रावण– अरे मर्कट मित्रा, तुझी विशाद काय !! मला तर मानव म्हणजे केवळ कस्पटा समान भासत आहे. पहा.

आर्या.

सोडी प्रभंजनास्त्रा कोंडी अद्रींसे[6] आड घालून ॥
वारा राम ससैन्यचि होईल मानी मनी अतींदून ॥ ३५

राम– अरे दुष्टा तूं आपली दुष्ट बुद्धी खेळवेल तितकी खळवितोस; परंतू नीचा, वाळूची भिंत किती टिकणार आहे? (वज्रास्त्र सोडितांच सर्व पर्वत चूर्ण होतात.)

रावण– अरे पोरट्या, तूं युद्ध सामर्थ्यानें फारच घमंड बाळगून असशी-

---

[1] सैन्यावर. [2] आकाशाला. [3] पृथ्वीला. [4] गरुड. [5] वानास्त्र. [6] पर्वत. [7] दुर्बळ.

ल मी आपली उगीच इतकावेळ पोर चेष्टेची मौज पाहिली, पण आतां तु-
झी उपेक्षा करीत नाहीं. (बाण मारतो.)

साकी.

दिनकर मुखसा सायेक सोडी जाचें तेज अपार
तो रामाच्या वामे पदाला लागुनि गेला दूर॥३६

(असें दृष्टीस पडतांच वानरगण क्रोधायमान होतात.)

वानरगण- (भुःपकार टाकून) अरेअरे चांडाळा हें वेरंगर, तुझ्या व
तुझ्या सेनेच्या स्त्रिया रंडक्या केल्या वांचून आम्ही रहातच नाहीं अघोर यु-
द्ध सुरू झालें, त्या काळीं असें भासलें कीं,

जसा ज्ञानरूप सूर्य अज्ञान तमानें समूळ नाहींसें करतो. तसा तो रा-
गोपासक कपिभार असुर दलाचा विध्वंस करता झाला, परमार्थ रूप बाणें
करून शत्रु सैन्यांतील अभिमान स्वरूपी मुकुटांचें चूर्णच करून टाकिलें या-
वरून ही राक्षस गणांची व वानर समुदायाची लढाई झाली असें नाहीं, तर
जसें कांहीं नैराश्य चक्रें करून लोभ भाल्यास उडविलें स्वरूप साक्षात्का-
र बाणांनीं सिद्ध पताका खुडल्या बोध फरशानें मोह ध्वजास छेदिलें, अनु-
संधान परिघें करून जणु अविद्यारूप रथ चूर्ण केला, निश्चयस्त्रानें म-
त्सरास्त्राचा चुराडा उडविला, विरक्त गदेनें कुंजर काम विदारण केलें, क्रोध,
मत्सर, अहंकार इत्यादि योद्ध्यांस शमदमादि शस्त्रास्त्रांनीं पराजित केलें,
संकल्प विकल्प, द्वेष हींच कोणी कर्णकुंडलें समाधान शक्तीनें विदारून पा-
डिलीं. सारांश वानरांनीं असुर दलांचा चांगलाच चेंदा करून टाकिला, त्यां-
चे गज, रथ, घोडे इत्यादि युद्ध सामग्रीस जमीनदोस्त करून टाकिलें (असा
अघोर प्रकार इंद्रानें अवलोकन करून तो बृहस्पतीस म्हणतो.)

इंद्र- हे वाचस्पती राजाधिराज रामचंद्र त्रिभुवनेश्वर, गुणनिधान हा
सीतेचें निमित्तमात्र करून आम्हां सर्व देवांस बंधमुक्त करावयाचें योजी-
त आहे, इतकें मात्र खरें तर आतां त्या भक्तवत्सल भगवंतास आम्ही से-

---

१ सूर्य. २ बाण. ३ डाव्या पायाला.

वकांनीं समयानुसार सामर्थ्यानुरूप साह्य करणें योग्य आहे. तस्मात् माझा चतुर व शूर सारथी जो मातली त्यास शस्त्रास्त्र युक्त दिव्य स्यंदन देऊन रामाकडे पाठवितों.

**बृहस्पती:-** अहाहा तूं केवळ विवेकसिंधूच आहेस मनांत आणल्या प्रमाणें तुझे दिव्याश्व स्यंदनातें जोडून तो तूं मातली करवीं अतित्वर सुवेलाचल पर्वतीं जगद्वंद्य रामाकडे पावताकर.

**इंद्र:-** अरे मातली सत्वर आपला स्यंदन सिद्ध करून राम साह्यार्थ जावें.

**मातली:-** (वंदन करून) महाराज आज्ञेनुरूप हा दास कार्य करून येईल (निघाला आणि रामाकडे आला.)

**राम:-** (संतोषानें) अहाहा जसें क्षुधितास उत्तम भोजन द्यावें किंवा तृषार्तास सीत जल मिळावें, किंवा व्यथितास निर्मल रसराज प्राप्त व्हावा. किंवा मरण प्राय झालेल्यांस सुधारस प्राशनार्थ मिळावा. किंवा रणांगणीं पाठिराखा धांवून येतां जसा संतोष व्हावा. तद्वतच हा पुरंदरानें मदर्थ समयोचित मातलीस ह्य वर्तमान दिव्य स्यंदन पाठविला आहे. या गोष्टीचा मला मोठा धन्यता वाटते.

**मातली:-** महाराज आपण रथावर आरोहण करून युद्धास प्रवृत्त व्हावें आपल्या चरण कृपें करून मी हा रथ रण मंडळी प्रेरिता होईन

**राम:-** (रथास प्रदक्षिणा करून रथारूढ होतो)

साकी

गरुडावरती नारायण कीं उदयाचलीं[1] रवी[2] तो ॥
शोभतद्वत दिव्य रथावरि राम दिसोनी येतो ॥ ३७

**वानरगण:-** (हर्षयुक्त मुद्रेनें) अहो, राम कार्यास साह्य करणार नाहींत असे दुष्ट या जगती तलावर या राक्षसां वांचून कोण असतील ते असोत, पहा तो चतुर व थोरणी इंद्र राजा त्रिजगदाधिपती जो रामचंद्र त्याचे सेवेस कसा समयानुसार उद्युक्त झाला दिव्य रथ पाठविला ही गोष्ट त्यानें स्वामीस संतोष दायक केली. सारांश हे विघ्न हारक सुचिन्हच म्हणावयाचें श्रीरामचंद्रास

---

१ सूर्योदय ज्या पर्वतावर प्रथम होतो तो पर्वत. २ सूर्य.

कोठेंच उणेपणा यावयाचा नाहीं हेंच निःसंशय खरें आहे.

रावण- (क्रोधानें) अरे त्या हलकट इंद्रानें या मानवाच्या कार्यास आकाश पंथें रथ पाठविला काय?

सार्की.

कर कर कर कर दांत ओंठनें खाई रावण भारी
दिसूं लागलीं सर्व लक्षणें यमापरीतीं सारीं॥३८

आर्या.

संताच्या लीलेनें॥ देखुनि ये निंदकांस बहु वीट॥
न हूत रथास येतां॥ त्रास करी तो मनांत अतिधीट॥३९

श्लोक

(शार्दूलविक्रीडितवृत्त)

हिंदूंची स्फुरमूर्ति देखुनि बहू स्वांतात संतापती॥
जैसे मूंछ सदां नसा खवळला चित्तांत लंकापती॥
रामाच्या कपिनीं विटंबिलिसती नामें जि मंदोदरी॥
दुःखाधिक्य गमे तिच्या हुनि नया कीं इंद्रजीतापरी॥४०

अरे दुष्टा मानवा, आतां मीं या अति दुःसह दुःखाचें परिमार्जन केल्या वांचून रहाणार नाहीं (प्रत्यंच्या आकर्ण पर्यंत ओढून तीव्र बाणाची वृष्टी करतो.)

राम- (उच्च स्वरानें) अरे शतमूर्खा मदोन्मत्ता, ही तुझी अपार जिव्हा मीं क्षणार्धांत छेदन करण्यास समर्थ आहें तुसल्या बडबडींत काय अर्थ आहे? काय पराक्रम असेल तो येथें समरंगणीं प्रगट कर चल (रथ पुढें सरसावितो. आणि वायुवेगवत् बाणामागें बाण सोडितो.)

विदुषक- (घाबरल्या सारखें करून) सूत्रधारा, अरे हे अकाळ विकाळ स्वरूपी दोघ जण काळ महाकाळ नर नाहींतना? पहा ते दावाग्नी वडवाग्नी सदृश संतप्त दिसत आहेत त्यांच्या रथाचा घडघड ध्वनी मेघ गर्जनेचे परी उठत आहे, परस्परांवरील सैन्यावर असंख्य बाणांचे वर्षाव होत आहेत, आणि त्या राक्षस-सैन्यावर नर त्या अद्भुत पराक्रमीं वानरांनीं टोळांच्या धाडी प्रमाणें गहजब करून

---

१ रावण २ यवन.

न दिला आहे, रुधिर धारांच्याजणु नद्याच वहात आहेत कीं काय? असें वाट-तें, रण धुळीच्या वावटळीनें गगन आच्छादित झालें आहे, हें महान् घोर युद्ध अवलोकन करून सुरगण भयचकित होत्साते आपलीं विमानें सोडून भलती कडे पळ काढीत आहेत, ओहो आतां तर बाणाचा असा धडाका चालला आहे कीं, जेणेंकरून वाऱ्यासही फिरावयास रीग होत नाहीं. नक्षत्रें खळखळां रिचवतात, विद्युत्पात होतात, ही धरणीमाई तर चळचळां कांपत आहे, सप्तपातळें हेलकावत आहेत, शेष, कूर्म ड्चकून गेले आहेत, असो, तर सूत्रधारा मी आपला जातों, बाबा, कारण धट्टा खट्टा या दोघांच्या लढाईत कुट्टा न खावों म्हणजे झालें

सूत्रधार- अरे वेड्या एकीकडे हो, तुझी या रथांच्या टकरीच्या धडाक्यांत वकरी साररवी वें वें होऊन जाईल यांचा सारथी त्याच्या सारथ्यास, इकडची वानरें तिकडच्या राक्षसास एकसारखें झोडून मोकळें करीत आहेत.

विदुषक- अरे हा धांगड धिंगा अहोरात्र सप्तदिन पर्यंत चालला आहे तरी अद्याप कोणाचाच इंगा जिरला नाहीं; पण आतां दोघेंही रथाखालीं उतरून पादचारी लढण्यास आरंभ करीत आहेत, त्यापेक्षां लवकरच शह भिशह कायतो समजेल.

रावण- अरे कार्ट्या, माझ्या तीव्र बाणें करून तुला व तुझ्या सैन्याला जर्जर करून टाकिलें आहे; त्यापेक्षां सत्वर शरण ये.

राम- अरे मूरखा तुझ्याच सैन्यांतील बहुतेक वीर पुरुषांचा चुराडा उडाला तरीं अद्याप तुझी निशा पटत नाहीं काय? तुला आपल्या जीवाची गरज असेल तर तूंच मला शरण ये, शरण येणारांस मी मरण चिंतिणार नाहीं.

रावण- (फार क्रोधानें) अरे पोरट्या, औंतुलातर मी कोंवळ्या कांकडी प्रमाणें कर करां चावून टाकीन तूं तर माझ्या एका झडपीस देखील पुरणार नाहींस, हे लघुबालका प्राण रक्षण करून सत्वर निघून जा. यांतच मौज आहे नाहीं-तर मी तुझी सांगडीच सेवा करीन हें पक्कें समज.

राम- (चापास बाण लावून) बरें तर या वल्गनेचें फळ मी तुला दाखविल्या वांचून रहातच नाहीं.

साकी.

असंख्य नर हो भावांबु धीतुनि तरती ज्याच्या नामें
रावण रथिचे वारु छेदिले चौबाणीं त्या रामें ॥ ४१ ॥

रावण- अरे कार्था त्वां माझ्या दिव्य रथाचे अनुपम्य वारू भग्न केलेस परंतु असे असंख्यात अश्व पुनः पुनः रथास जुंपण्यास मी समर्थ आहें. हें तूं जाणत नाहींस काय? तुला दुष्ट बुद्धिरूप आकाबाईनें चांगलेंच घेरलें आहे काय? हें तर मग होऊंदे (असें करतो.)

साकी.

यत्न न लागतां लंकापतिनें नूतन हय जूंपीले ॥
रथास आपुल्या राम शराचें भग्नमनी आणीलें ॥ ४२

राम- अरे दुष्टा तूं आपल्या स्वसुरवें करून निज पराक्रमाचें वर्णन करतोस हें अति मूर्खत्व होय, ज्या मुखानी इतक्या वल्गना करीत आहेस, तीं तुझीं दश मुखें हा बाण एकदांच छेदन करील, अरे मतिमंदा तूं अद्याप तरी विचार कर, पहा पहा हा बाण सुटलापहा.

चामर वृत्त

सायकासनास सार्थ सोमबाण लावितां ॥
चंडकीर्ण ज्यापरी नभ ग्रहांत शोभतां ॥
तयापरी राम तदां शरास वेग सोडितां ॥
रावणाचि पाडिलो शिरें पलाच लागतां ॥ ४३

अरे अरे, अर्धचंद्र बाणें करून मी ही या दुष्टाचीं दशशिरें एक समयावच्छेदें करून छेदन केलीं, असें असतां तीं पुनरपि पूर्ववत उद्भवलीं आहेत काय? तर.

साकी

चक्र वदन शर शीघ्र सोडितां छेदन झालीं-
सारीं ॥ शिरें पुनर्भूपरी मारुती कादीतो अनिवारी ॥ ४४

रुद्र आणि कपि- (चिंतातुर होत्साते) अरे, या दुष्टाची दशशिरें पुनः पुनः उत्पं-

---

१ घोडे. २ धनुष्यास. ३ चंद्र. ४ सूर्य ५ शोभणारा. ६ पुनःउत्पन्न होणारीं.

च होतात. अतां हा दशकंधर कसा मृत्यु पावेल हें कृत्य महान अनिवार्य दिसतें, असो हा केवळ युद्धलीला प्रकार दृष्टीस पडला; असें झालें म्हणून आपण केवळ चिंताक्रांत व्हावें हें अश्लाघ्य होय, आपला स्वामी जो अनंत ब्रह्मांड नायक श्रीराम, तो हें महासंकट निवारण करण्यास समर्थ आहे.

मातली:- हे सकलचित्त चालका श्रीरामा, ह्या दशमुंडाचे हृदयस्थलीं अमृताची कुपिका आहे त्या योगें करून वारंवार शिरें प्रगट होतात. तर ती कुपिका फोडून टाकण्याचें शरसंधान केलें असतां हें विघ्न टळेल असें रवचित वाटतें

राम:- अरे मातली, अहाहा, तूं मनोभावें करून सारथ्य करीत आहेस यांत संशय नाहीं.

रावण:- अरे पोरा सिंहासीं जंबुकानें कितीही इरापदी घेतल्या किंवा सूर्यापुढें काडवातीनें आपला कितीही प्रकाश मिरविला तरी त्याची साम्यता होणार आहे काय? तद्वतच तूं माझें शौर्य पाहून वैर सोडून धैर्य धरून दौर्बल्य धारण कर आणि निघून जा.

राम:- (अगस्तीदत्त बाण काढून) घेघेच आतां, चौर्याचें वैर फळ आलीच तुझ्या देह विसर्जनाची वेळ (मग असें करतो.)

आर्या.

रामें बाणी धरणी[1] सप्ताब्धी[2], अग्नि वायु शशि[3] तरणी[4] ॥
यांची सत्वें योजुनि वधिन वदे आशु[5] रावणा सरणी ॥ ४५
गंधर्व किन्नर व्रज[6] देवर्षी कूर्म शेष यम वरुण ॥
यांची पूर्णा शक्ती ठेवी शरिं राम जानकी रमण ॥ ४६
बाणाग्रीं ब्रह्मास्त्रा स्थापितसे राम मंगलायतन[7] ॥
तोरें झळके रविसम सर्वांचे दीपले तदा नयन ॥ ४७ ॥

साकी.

सणणणणणणणाण निनाद[8] झाला बाण सुटतेवेळीं ॥

---

१ पृथ्वी. २ सात समुद्र. ३ चंद्र. ४ सूर्य. ५ त्वरित. ६ समुदाय. ७ मंगलस्थान. ८ शब्दध्वनी.

धडडडडडड वदनें पडली चुकेन लिहिलें भाळीं ॥ ४९

अरे दुष्टा, कुलाधमा, घेच आतां स्वकृतीनें पूर्ण प्रायश्चित. (रावण प्राणा-
समुकला.)

साकी

रामशरानें मृत प्रायतो, पडतां रावण दांड ॥
घणघणघणशा दुंदुभिनादें दणाणलें ब्रह्मांड ॥ ५०
सुरनरकिन्नर अंतारिं नोधुनि करिती जयजयकार ॥
रधुपतिवरती सुमनवृष्टी झाली तें अनिवार ॥ ५१ ॥
पुच्छ उभारुनि महदानंदें नाचति कपिगण वीर ॥
विजयी झाला वदती आमुचा राम सवारण धीर ॥ ५२ ॥

**विदुषक:-** सूत्रधारा, अरे काय हा रामाच्या बाणाचा प्रचंड प्रताप ज्यावेळेस श्रीरामानें आकर्णपर्यंत प्रत्यंचा ओढून बाण सोडिला त्यावेळेस त्याच्या त्या अघोर व अप्रतीम टणत्कारानें जणु महा प्रळयकाळच्या दत्त दरा प्रमाणें गर्जना केली असें भासलें, पृथ्वी डळमळूं लागली आहे आणि कित्येक शूर वीर भय मूर्छित होत्साते धाडकन् आपटले मला वाटतें ते पडले नाहींत तर त्यांनीं रामाच्या बाणप्रतापास साष्टांग नमस्कारच केले असावेत. जसा देवांत इंद्र अंडजांत गरुड, वानरांत वायुकुमर श्रेष्ट आहे तसाच हा पहा महाप्रतापी बाण सर्व शस्त्रास्त्रांत वरिष्ट होता, या अद्भुत बाणानें त्या धिप्पाड व लठ्ठ निरांजनी रावणाच्या दशमुंडाचा एका सपाट्यांत सप्पा उडविला, अरे पण न जाणो हें बाळ पुन्हां उठलें तर तें सकृत दर्शनी माझीच गठडी करून टाकील, मी आपला एरव्हींच करिष्ये. माझ्या अवडत्या प्राणास मुकेन, तो मेला किंवा नाहीं तें पाहूं काय?

**सूत्रधार:-** तूं अद्याप भ्रमांतच गटंगळ्या खात आहेस काय? रावण राजीच्या हृदयमंदिरीं अमृताची कुपी होती तिच्या योगानें पुनः पुन्हां शिरें निर्माण होत असत; परंतु या महा सामर्थ्यवान् बाणानें नायकासमक्ष सुरतांच पूर्वी रामाच्या कर्णात सांगितल्या प्रमाणें रावणाच्या वक्षस्थळाचा चिद्रु

---

१ संतोषून. २ पुष्पवृष्टी.

रसम भेदकरून अमृताचे कुपिकेस फोडून टाकून तीन शिरें उडविलीं आणि आपोआप रामाच्या भात्यांत येऊन शिरला. अशी ही दुर्धर गोष्ट घडली यापेक्षां त्याचाजीव भूतलावरती भ्रमण करीन असेल असें वाटत नाहीं.

राम:- (बाण काढून) हें अजून याचीं सप्तशिरें तोडावयाचीं उरलीं आहेत काय? तीं तर आतांच छेदून टाकीन.

लक्ष्मण:- (करजोडून) हे श्रेष्ठ बांधवा, तोदुष्ट निशाचरपती निःसंशय मृत झाला आहे आपण बाण मारिला असतां तो त्या उर्वरीत सप्तशिरांस स्पर्श करण्यास पात्र नाहीं, याकरितां पुढें युद्ध पुरें करावें असें वाटतें, चला आपण त्याची तीं मेनकाया अवलोकन करूं

राम:- हे परम प्रिया बांधवा, हें सायकासन घे आतां आमच्या अवतार कृत्याचा मुख्य हेतू संपला (इतक्यांत)

विदुषक:- (रावणाजवळ जाऊन पहातो) अरे हें याचें नाक आहे कीं नाकोबा आहे. श्वासोश्वसन बंद झालें असतां पक्का मेला असें समजतात, तर मी या मठ्ठलठ्याच्या नाकपुडीवर हात ठेवून पाहूं का नको बाबा. जरका नासिकाच्यातुन वायूच्या सोसाट्यांत मीं सापडलों तर कोणी कडच्या दऱ्याखोऱ्यांत जाऊन पडेन याचा नेम नाहीं, अरे खराच हा मेला. छातीयाची अठरामासे चांदी पहा याच्या अफाट छातडाचे भगदाड जसें एखाद्या सखोलशा तलावाप्रमाणें दिसत आहे, याच्या या अवजड शरिरास उचलावयास कितीतरी अवचट खवट्च धट्टे खट्टे असे धडिंग भडिंग राक्षस लागावे लागतील कोण जाणें, कांहींपण सूत्रधार रावजी हा बंबेश्वर जेथून उत्पन्न झाला ती गुहातरी केव्हढी अफाट असेल हो, अहो हा विचार राहो, पण ज्या मायेच्या उदरीं हें बाळ नवमास मलमूत्रांत लोळत पडलें असेल त्याठिकाणच्या कचेरीचा थाट कसाकाय असेलबरें? असो हें हीनकोपण या रावजीस बाळपणीं जीदुग्धपान करवीत असेल तिच्या वक्षस्थलावर केवढाले दुग्ध पयोधर असतील बरें?

सूत्रधार:- काय मुलाच्या शंका!! अरे दिवट्या उगीच कांहीनास मुलाया विचारांत काय फायदा आहे.

विदुषक:- अहो तर नाहीं का आगीकडे आमची म्हैस उडाली आहे म्हणून

म्हटले कीं, आयती दूध पिळून आणण्याची कांहीं टांकी लागली तर चांगलेंच.

**सूत्रधारः-** वाहवा, वाः तुझा काय, " टकाशेर खाजा और टकाशेर भाजा " किंवा "सकट घोडे बारा टक्के" सारखेंच, असो प्याद्‌मात केलीस, पहा बरें, त्या श्रीरामावर व्योमधरांतून सकल कपेश्वर व सूर क्रमनें क्रमनवृष्टी करीत आहेत, महदानंदें करून वानरगण आपलीं पुच्छें उभारून नाचत आहेत. सर्व जनांस रामविजयाचा जो संतोष झाला तो त्रिभुवनांत मात नाहीं (राम व त्याचे शूर वानरगण त्या मरून पडलेल्या रावणा संन्निध येतात.)

**मारुतीः-** हे रणरंग धीरा परमेश्वरा पहा या दुष्ट शत्रूच्या मुखांवर गृध्रपक्षी बसून ते त्याचे द्विदश नयन आपल्या चुंचुपुटांनें फोडीत आहेत, वक्षस्थळांतून रुधिराभिसरण एकसारखें होत आहे आणि हीं प्रचंड शिरें भूमिकेंत मिळालीं आहेत, वाइटाचा परिणाम वाइटच.)

**बिभीषणः-** (अति दुःखानें) हे श्रेष्ठ बांधवा आज एकाएकी तूं मला सोडून गेलासना? ज्याच्या अगाध प्रताप बळास सकल राजराजे वानीत असत. तो आज सर्व शक्तीहीन कसा झालास, हे चातुर्य समुद्रा, रावणराया, तूं वेदांचीं खंडें करून पाखंड मताचीं बंडें मोडून टाकिलींस तुझा तप सामर्थ्यें करून संतति, संपत्ति इत्यादिक ऐश्वर्य प्राप्त झालें असून त्याचा एकाएकी कां बरें त्याग केलास. (नेत्राश्रु येतात.) त्वां सर्व देवांचे गर्व हरण करून त्यांस बंदींत घातलेंस, तात्पर्य अशा अशा अद्भुत करणीनें त्या पुराण पुरुष श्रीरामास तो निर्गुण असतां तुज करितां सगुणावतार धारण करावा लागला. त्या जानकीस आणिल्या मुळें भक्तवत्सल भगवंताचें आम्हांस प्रत्यक्ष दर्शन होऊन तो आमचा मित्र झाला. ही तुझी कीर्ती यावत्‌चंद्र सूर्य आहेत तावत् त्रिजगीं कायम रहाण्याजोगी झाली, परंतु तुजवांचून मला प्रस्तुत तर दशदिशा शून्यवत् भासत आहेत (ऊरबडवितो.) बंधो, एकवार तरीं मजकडे पहा, आतां मी रावण दादा असें कोणास बरें हाक मारूं? ही सर्व लंकापुरी विधवेपरी निस्तेज दिसत आहे, रावणभाऊ, अँ अँ अँ अरे मजशीं एकवार तरीं सप्रेमभावानें बोल बरें आतां मी कसें करूं, दादा तूं माझें ऐकत नाहींसना? दादा, दादा, इकडे पहा, इकडे पहा (फार आक्रांत करतो. तो ऐकिला असतां थरकांप होतो.)

**राम**:- अरे परम भक्ता, बिभीषणा, धैर्य धरून कांहीं विचार कर. शय्येवर ये. नाशवंत वस्तूसाठीं किमर्थ शोक करतोस? हा मायामय जगडंबर पसारा केवळ मृगजळवत् आहे. जसें वंध्यावल्लीचें फळ मुळापासूनच खोटें तसेंच हें सर्व आहे. जेथें आकार तेथें विकार आहेच आहे. तूं केवळ विवेकमूर्ती असतां अशाश्वताचा इतका शोक करतोस हें ठीक नाहीं " पुनरपि जननं पुनरपि मरणं " हा तर नित्य मायेचा खेळच आहे. पहा दूर दृष्टी देऊन या भव[१]भ्रमांतून शय्येवर ये (बिभीषण उगाच बसतो)

**मंदोदरी**:- सर्व स्त्रियां सहित येऊन पतिप्रेतास कवळून) अहो प्राणनाथ, आधींच कींहो मी सांगत होतें परंतु तें मनांत न आणितां शेवट अशा रीतीनें गोड केलात काय? माझ्या समुळ सौभाग्याची महान् हानी झालीना? अग आई आतां काय करूं? हें परम दुःसह दुःख कोणाला तरी सांगूं? शिव शिव, (तोंड झोडिते.) माझा प्राणनाथ केवळ गुणाचें जहाज असून तें आज या समरांगणरूप जलधांत बुडालें काय? आतां मी काय करावें बरें?

साकी.

जयलक्ष्मीतें देउनि जांवई केला जणु रघुनाथ ॥
पतिविण परि अम्हि दिसलों साचा सर्वहि दीन अनाथ ॥५२

आर्या.

राघव केशरि जणुतो हारुनि लंके[२]स शीर्षिच्या मुक्ते ॥
राकुनि दरगिं ऐसें वर्णिल नर जो असे बहू वक्ते ॥५३॥
प्राणपती वदानें फुटलें आजी समग्र सांठवण ॥
भक्त विरोधी तूंही राहिल लोकीं सदैव आठवण ॥५४

श्लोक

सांठीवलें अंतरि रामनांव ॥ दाविला लोकीं विरुद्ध भाव ॥
विस्तारला हा त्रिजगीं प्रभाव ॥ आम्हां करूं कें विउपायराव ॥५५

(परंपधरतो) आतां आमचा वाली तूंच आहेस.

---

१ सिंह २ लंका रूपदती ३ गंत्यास ४ युद्धांत ५ संभाषण कर्ता.

श्लोक

आह्मां देवा हृदय फुटतें जीव माझा गळाला ॥
दुःखाग्नी हा सतत अदयें जाळितो काळजाला ॥
दावूं कोणा वदन असलें म्लान जीवेश्वराला ॥
लोकांमाजी मज गतधवा बोलती हा कपाळा ॥ ५६

(स्फुंद स्फुंदून अत्याक्रोश करिते.)

राम:- बिभीषणा, तुझ्या ज्येष्ठ भ्रात्याची पत्नी ही महान् पतिव्रता असून ज्ञानाची तर केवळ लावण्य खाणीच आहे हिचें प्रातःकाळीं नामस्मरण केलें तर पातकाचें निरसन होईल अशी ही आहे. तूं तिला चार समाधानांच्या गोष्टी सांगून स्वस्थानीं जावयास सांग.

बिभीषण:- (मंदोदरी संनिध येऊन) अहो वहिनी बाई, आतां हा महाशोक आवरावा, जें होणार तें होऊन चुकलें "गतश्शोचामि कृतन्न मन्ये" या वचनावर दृष्टी देऊन शोकार्णवांत मज्जित होऊं नये हा पूर्णपरात्पर सच्चिदानंद भगवान् श्रीरामचंद्र ज्या कर्मे करून अनायासें सन्मुख प्राप्त झाला त्या कर्माचें या वाचेनें दुःखभरीत आपल्या सारख्या स्त्रीनें उच्चारण करणें अप्रशस्त होय, माझा श्रेष्ठ बंधु अद्वितीय विरोधभक्ती निजगीं प्रगट करून परिणामीं निजानंदीं स्थापित झाला, व्यवहार दृष्ट्या जें काय दुःख उत्पन्न वळतें तें केवळ घोर भ्रमाचें लक्षण होय हें आपणाही जाणतच असाल. तस्मात् मज बालकावर दृष्टी देऊन या सृष्टींत धन्यता रहावी म्हणून माझ्या वचनास मान्यता द्यावी. (तिचा कर धरून जावयास सांगतो.)

राम:- हे महापतिव्रते, मंदोदरी, तूं ज्ञानी असून हा अज्ञानीपणाचा भ्रम कशाकरतां करतेस, नाशिवंत वस्तु विषयीं असा गहन शोक करणें नीट नाहीं. त्याच्या त्याग करावा, आत्मस्वरूप पूर्ण शाश्वत होय, हें अद्वैत ज्ञानानें अवलोकिलें असतां तेव्हांच समजून येतें; वास्तव मूळ दृष्टी देऊन विचार कर आणि ह्या सर्व स्त्रियां सहवर्तमान निजधामी गमन कर. भक्तजनांच्या तारणार्थ हें मायामय कृत्य आहे, असें सत्य समजून ऐस.

मंदोदरी:- (रामचरण वंदून) हे त्रिविधताप संहार कर्त्या, परमेश्वरा, श्रीरामा,

माझा महान पराक्रमी यजमान त्वच्चरणीं निजदेह अर्पण करताझाला. याचें-मला अज्ञानपणें दुःख सोसवत नाहीं; परंतु सर्व दुःख परिहार कर्ता जो तो तूंच माझें अज्ञानत्व निरसन करून माझ्या हृदयीं ज्ञानसूर्य प्रकाशित केला ते-णें करून मीं कृत कृत्य झालें महान् महान् तपोनिधींस जे चरण कमल अ-गम्य ते दर्शनास अनायासें मला प्राप्त झालें तेव्हां आतां शोक कसा उरेल? असो (सर्व स्त्रियां सहित राभाज्ञा घेऊन गमन करिते.)

**बिभीषण:-** हे भक्त मानस चकोरघना आपली आज्ञा व्हावी म्हणजे या राज-देहाचा उत्तर प्रकार विधिपूर्वक होईल.

**राम:-** बिभीषणा आतां मीं सुवेलाचलीं गमन करतों, तूं यथा शास्त्र उत्तर क्रि-या विधी संपवून सत्वर तेथें यावें (गमन करतो.)

**बिभीषण:-** (लंकाधीशाचें प्रेत संस्कार पूर्वक सिद्ध संगम नामक नदीवरती नेवबितो.)

साकी.

वसंतिसरिता पावन भागीं सिद्धसंगमीं नेलें
राजकलेवर प्रळयाग्नी साधिं संस्कारें टाकीलें॥५७

पुढें उत्तर क्रिया स्वतः ब्रम्हदेवानें सांगितल्या प्रमाणें केल्यावर तो प्रधा-नादिक सकल प्रजांसहवर्तमान सुवेलाचलीं येऊन रामपदावरी लोटांगण घालतो.

**राम:-** बिभीषणा तूं जिकडील तिकडे व्यवस्था करून आलास काय? आतां शो-तता धारणकर.

**बिभीषण:-** (प्रेमयुक्त मंजुळ अशा अमृत वचनांनीं) हे अमलदल राजीव नय-ना ब्रम्हांड नायका षड्गुणैश्वर्य संपन्न श्रेष्ठा आपण मजदीनावर कृपा करू-न ते विरिंची कर निर्मित लंकानगरी अवलोकन करावयास चलावें, आणि मग मा-झ्या माते (सीते) सह वर्तमान त्या अतिरम्य अयोध्यापुरीस स्वेच्छेनुसार जावें.

**राम:-** (हास्य वदन करून) हे परम भक्ता, बिभीषणा, ती लंका मी तुलाच दान केली आहे तिचें तूं निरंतर यथायोग्य राज्य कर मला तेथें येणें उचीत नाहीं, कारण.

श्लोक.

कन्यादान करूनि घेति तिचिये ज्ञानी न कांहीं चरे

(पेन. पैसा अडका कांहींच घेत नाहीं.)

कीं विप्रा प्रतिदान गेहे करुनी जातीन तेथें वरें
सत्पात्रीं दिधल्या पयेस्विनि त्रिया दुग्धास घ्यावें कसें॥
लंका अर्पियली तुला म्हणुनियां येणें घडेना तसें॥ ५८.

अरे बिभीषणा, मी भरत भेटीस्तव तांबूल वर्जन व्रतादिक संपूर्ण व्रतें धरलीं आहेत; तस्मात् मीं लंकावलोकनार्थ येण्याचें वर्ज केलें एतद्विषयीं किमपीही साशंकित होऊं नको.

**बिभीषण**:- हे परम सद्गुरो आपण म्हणतां तेंही खरेंच आहे परंतु मला मात्र कसें वाटतें तें सांगवत नाहीं.

**राम**:- अरे सौमित्रा, तूं मित्र नंदनादि वानर गणासहवर्तमान् लंकेप्रत जाऊन समग्र देवांस बंध निर्मुक्त करून त्यांचा सादर पूर्वक सन्मान करावा. आणि छत्र चामरादि राज चिन्हांनीं बिभीषणास विभूषित करून त्यास लंका राज्यीं मोठ्या थाटानें स्थापन करावें (लक्ष्मण वंदन करितो.)

**लक्ष्मण**:- हे श्रेष्ठ बांधवा आपले आज्ञेनुसार मी सुग्रिवादिकपिसमुदाया समवेत लंकापुरींत गमन करून बिभीषणास शास्त्रोक्त मानानें राज्यीं स्थापन करतों.

**राम**:- हे परम भक्ता बिभीषणा, तूं सौमित्रासह स्वनगरीं जावें. रावणानें ज्यांच्या ज्यांच्या वस्तू हरण करून घेतल्या असतील त्यांच्या त्या त्यांस परत देऊन सकल प्रजाजन नीती शास्त्रानुरूप वर्तवून सुखी करावें, जसें ध्रुव, बली, उपमन्यू इत्यादिक परमभक्त याभूतलावर चिरंजीव आहेत तसा त्याच मालिकेंत तूंही सुखी रहा तुला तेथें राज्यपदीं स्थापन करतील त्यांचा आनंदें स्वीकार कर.

**बिभीषण**:- (वंदन करून) हे दीन रक्षका, महोदारा, आपली आज्ञा मला शिरसामान्य आहे, आपल्या चरणसेवा तसेंच करून हा दास पूर्वोक्त उपदेशिल्या प्रमाणें राजक्रम सुरळीत चालविण्यास समर्थ होईल. (लक्ष्मण, बिभीषण, नळ, नीळ इत्यादि वीर रामास वंदन करून लंकेप्रत जातात.)

---

१ ब्राम्हणास. २ घर. ३ दुभात धेनू.

# रावणवधनाटक.

## प्रवेश ३

स्थल

## लंकापूर.

पात्रें.

लक्ष्मण - .................................... रामाचा कनिष्ठ बंधू.
बिभीषण - .................................... रावणाचा कनिष्ट बंधू.
सुग्रीव - .................................... रवि पुत्र.
ब्रम्हदेवादि सुरगण - .................................... देवसमुदाय.



लक्ष्मण - (लंका वलोकन करून) हे सुग्रीवा ही लंका नगरी महा देदीप्यमान व विशाल असून हींत नानाविध अमोलशा अतिरम्य वस्तु दिसत आहेत अ- हाहा ह्या ईपाची अपूर्व रचना फारच सौंदर्ययुक्त आहे.

**सुग्रीव:-** खरेंच, असें कनकमय पट्टण पाहून चित्तास अत्यानंद झाल्या वां-चून रहात नाहीं; ह्या पुराच्या अंतर्बाह्य रचनेचा देखावा जोंजों अवलोकावा तों तों नयनांची शिराणी पुरत नाहीं. असो, सर्व सामग्रीची सिद्धता केली आ-हे; बिभीषणास राज्यपदीं स्थापन केव्हां करावयाचें?

**विदुषक:-** हे सूत्रधारा, आतां तर गड्या आमची खुप चंगळ आहे. त्या थोर-ल्या आवाचें (रावणाचें) पुरतें वाटोळें झालें तेणेंकरून सुर नर किन्नर सुखी झाले; परंतु त्याचेच हे धाकटे बंधू बिभीषणरावजी राज्यासनीं स्थापित हो-णार तेव्हां आतां मणगट बुडे पावेतों तूपपोळीचें संधान चांगलेंच जमेल ना-हीं बरें?

**सूत्रधार:-** जो ज्ञानी आहे त्यास रामचंद्राचा लीलाप्रकार पाहून ईश्वर भ-क्तांसाठीं कसकशीं महान् अघटीत कृत्यें करतो, हें समजून आलें असेल, परं-तु या ग्रहस्थाचें मन तूपपोळ्यांच्या भानगडींत गर्क होऊन गेलें आहे, अरे गृह-स्था, विदुषका तूं तर भिक्षुकीची प्याद मात केलीस, शाबास.

**विदुषक:-** अहो आमचें काम तें, नवरा मरो नवरी मरो आम्हांस दक्षिणा मिळाली म्हणजे झालें.

**सूत्रधार:-** बरें तर, तूं आपला या सुखाच्या लुटींत पाहिजे तितका हात मारू-न घे, किंचित ही डगमगूं नको, शेषावतार जो श्रीलक्ष्मण तो बिभीषणास मोठ्या थाटानें राज्यावर स्थापन करील तेव्हां तुम्हां भटांवाचून सर्वच सुखी होतील, अशास-मयीं तूं खाण्यापिण्याची मोडशी होई पावेतों चैनबाजी करून घे.

**विदूषक:-** अं अहाहा, हूं चांगलेंच संधान सांगितलेंस ह्या घमंडानंदन तसें करावयास कधींही कसूर करणार नाहीं.

**लक्ष्मण:-** बिभीषणा, हीं दिव्य वस्त्र भूषणें परिधान कर.

**ब्रम्हदेवादि सुरगण:-** (बिभीषणास छत्रचामरादि राजचिन्हांनीं अलंकृत करून वेदमंत्र घोषें सिंहासनीं यथाशास्त्र स्थापन करतात.)

**बिभीषण:-** हे विश्वंभरा भक्तकाम कल्पद्रुमा, हें सिंहासन आपल्याचरण कमल कृपें करून मला प्राप्त झालें. याचा वास्तविक हक्क माझ्या ज्येष्ठ भ्रात्या-चा असून त्यानें तो निंद्य कर्मानें दवडिला यास कोणाचा उपाय नाहीं, असो यादे-

ह्यापासून कोणाल्याही प्राण्यांस अनुचित मार्गानें दुःरव न होईल अशी प्रेरणा प्रा-ह्मा हृदयीं वास करण्यास आपणच सर्वशक्तिमान्पणें प्रवर्तक आहांत. (लक्ष्मण) सुग्रीव इत्यादि कपि समुदाय व सुरगण, यांस नानापरीचीं अमोल वस्त्र भूषणें इत्यादिकें करून मह प्रेमभरें सादरपूर्वक गौरवून त्यांचे चरण वंदन करितो.

**लक्ष्मण**:- बिभीषणा, आतां आम्हीं सर्वत्र मंडळी सुवेलाचलीं सानंदपूर्वक गमन करतों (जातात)

## प्रवेश ४ था.

स्थल

### सुवेलाचल

पात्रें.

राम ···· रावणारी. लक्ष्मण ····· रामाचाबंधू. इंद्रादीसुरगण ····· देवगण.
सीता ···· रामस्त्री. मारुतीसहकपि ··· वानरगण. बिभीषण ··· राव०बं. शर्मा त्रिजटा.
सी·दा·



लक्ष्मण– ( रामास वंदून ) हे श्रेष्ठ बांधवा, त्वदाज्ञेनुसार, मी बिभीषणास लंका राज्यीं स्थापन करून सर्व मंडळी सहवर्तमान आपल्या चरण सेवे-शीं तत्पर झालों आहें.

साकी.

ब्रम्हादिक सुर महदानंदें करिती सुमनवृष्टी
रामावरती अगणित वाद्यें दणाणली तैं सृष्टी॥५९

शंकर– ( रामानें आगत स्वागत केल्यावर ) हे जगद्वंद्या रामा,

साकीः– सत्येंशान्तवनामें झालों शीतल कंठीं रामा॥
लंकापतिवधवार्ता परिसुनि पावतिसुर विश्रामा॥६०

इंद्र– हे जगन्नियंत्या, आपणें सर्व संकट निर्मूल केलेंत तेणें करून जो महदानंद मास झाला आहे तो त्रिभुवनांत मात नाहीं; परमेश्वरा.

साकी.

त्रिदशाराध्या भक्त रक्षका असुरा तूं कैवारी
रावण वधुनी अह्मां संकटें विलया नेलीं सारीं॥६१

राम– ( सर्वांचा सन्मान करून ) हे सुरवंद्यहो, यांत मी कांहीं विशेष केलें ना-हीं हा जगन्मायेचा नित्य खेळच आहे, ती अनंत शक्ती आदिमाया आपणांसर्वांस जसें वर्तवील तसें करणें भाग आहे. तुमच्या पुण्यबळें करून आज हा सुदि-वस मास झाला, हें मात्र खरें आहे. ( याप्रमाणें परम रसाळ संभाषणें हो-त आहेत तों इकडे त्या सभास्थानीं असें घडतें. )

साकी

अष्टनायका गाति नाचती नारद तुंबर गान.
करिती विभ्रुध्या सन्मुख ठेविति रामपदावरि भान॥६२

मारुती– हे ब्रम्हांड नायका, आपली अनुपमेय पराक्रमशक्ती अवलोकन करून सकल देवर्षी अत्यानंदांत निमग्न होऊन गेले आहेत, व त्वच्चरणांबुज दर्शनार्थ गण, गंधर्व, यक्ष, किंनर, सुरासुर, नर, वानर हे या दिव्य स-

---

१ सत्यलोकाधिपते. २ आराम ३ देवांस पुज्य ४ नाशापन्न ५ गायन ६ चित्त.

वेलाचल पर्वतीं एकत्र झाले आहेत, आनंद जनक वाद्यांचे मधुर व सुस्वर असे नानाविध गजर होत आहेत, सुरांचे मुकुट परस्परांच्या मुकुटांशीं आदळत आहेत. त्यावरचीं अमोल रत्नें भगणाहून तेजाळ दिसत आहेत, अशी ही अत्युत्तम आनंदाची लूट चालली आहे खरी. परंतु यांत ती सर्व शक्ती आदिमाया सीता नसल्यामुळें मी आपल्या आज्ञेची वाट पहात आहे. तेव्हां.

राम:- हे भक्तवर्या, तुझा हा वाग्विलास या समयीं परम संतोषास्पद होय बरें तर त्वां सत्वर लंकेंत जाऊन बिभीषणास सांगावें कीं, सीतेला मंगल स्नान घालून वस्त्रें भूषणें परिधान करवून सुखासनारूढ होत्साती पाठवावी.

मारुती:- ही अमृत माय श्रुती कर्णीं येतांच नमन करून.

श्लोक.

भुजंगप्रयात.

जसा बाळ सोत्कंठ सोधी स्वमाय, रमादर्शना जाई कीं वैनतेय[१] ॥
तसा मारुती तें खपंथें[२] उडाला, अशोकाख्य[३] त्या काननें[४] शीघ्र ठेला[५] ६३

सीता:- ( मारुतीनें वंदन केल्यानंतर ) हे रामभक्ता मज कारणें तूं वारंवार अतिशय श्रम घेत आहेस. हे तुझे मजवर अगणित महदुपकार आहेत आतां माझी व माझ्या प्राणसख्याची भेट केव्हां होणार, तें निवेदन कर?

मारुती:- महाराज अयोध्याधीश श्रीराम यांनीं त्या दुष्ट दशमुखी रावणाचा युद्धांत स्वपराक्रमानें वध करून लंकापतित्व बिभीषणास देऊन सकल देवर्षी बंधमुक्त करून सुवेलाचलीं सेनेसह वर्तमान ते सर्व सुखी आहेत, आपल्यास न्यावया करितांच मुद्दाम त्यांनीं मला पाठविलें आहे तर सत्वर चलावें.

सीता:- ( आनंदाश्रु येतात. ) अरे हें तुझें रसाळ वचन अमृताहून ही अत्यधिक गोड लागत आहे. प्राणनाथाच्या व माझ्या वियोगास षण्मास होत आले. तेव्हां आतां तर मी आपले पंच प्राण केवळ वाऱ्यावर ठेविले आहेत, ते चिन्मय सुखदायक परम पवित्र पतीचे चरण कमल जेव्हां निज नयनीं अवलोकन करीन तेव्हां निजानंद सर्वांगत होईल.

---

१ गरुड. २ आकाशमार्गें ३ अशोकवन. ४ अरण्यांत. ५ उभा राहिला.

मारुती-(बिभीषणाकडे जाऊन) हे बिभीषणा सीतेला मंगळस्नान घालून, व वस्त्र भूषणांनीं विभूषित करून, सत्वर स्कंधावरी घेऊन यावें अशी श्रीरामाची आज्ञा झाली आहे.

बिभीषण- (आनंदानें मारुतीचा कर धरून) अहाहा मीही याच विचारांत होतो, चलातर आपण आतां त्या जगन्मायेकडे जाऊं (जाऊन वंदन करतात.)

सीता- हे बिभीषणा, हे मारुती तुमची रामचरणारविंदीं परम भक्ती आहे तस्मात यावत् चंद्रसूर्य आहेत तावत् तुम्हीं चिरंजीव सुखी असावें. बिभीषण त्वांलंकेचें राज्य सुखरूप व न्यायें चालवावें.

बिभीषण- हे प्रणवरूपिणी, सगुण भरिते, जगन्माते, त्वां सलीले करून अनंत ब्रम्हांडाची रचना केली आहेस. ब्रम्हा विष्णु महेश ये तुझ्या तिन्हीं बाळा करवीं उत्पत्ती स्थिती लय तूंच करितेस, हें गुप्त सार तुझें तुलाच सर्व माहित आहे, रावणानें कापट्यें करून तुला लंकेंत आणिलें ही तरी तुझीच इच्छा, परंतु या योगें करून सकल सुरवर बंधमुक्त झाले आणि आम्हां सर्वांचा जगदाधिपती परम मित्र झाला हा तरी तुझाच उपकार असो, हे अनादिसिद्धे आदिमाये, आतां कृपाकरून मंगलस्नान करावें वस्त्र भूषणें स्विकारावीं आणि स्कंधावरी रघुनंदनाकडे शीघ्र चलावें.

सीता- (हे बिभीषणा.)

सार्की.

रामनकरितां मंगलस्नानाकरूं कसेंमीआधीं
परमदूषणादेतिल जनहे मनाकल्पनाबाधी॥ ६४

मारुती- माते, श्रीरघुनाथानेंच बिभीषण वचनानुरूप मंगलस्नानादि व्यापार तुवां करावा म्हणून आज्ञा दिली आहे तस्मात् आमचीविनंती मान्य करावी.

सीता- बरें आहेतर (बिभीषण मारुती एकीकडे बसतात.)

सार्की.

बिभीषणाचीपट्टराणीहे शामा त्रिजटासेरीं
उपचारानें सकळघेउनीआलीतेधें वेगें॥ ६५

मणिमय चौकीवरती बसवुनि चरणा प्रक्षाळीलें
सादर पूर्वक मृगमद चंदन अंगानें केलें ॥ ६६
त्रिजटा स्वकरीं मर्द्धा करा दिला उष्णोदक शर्मेनें
ओतावें तत्कृशतनु देखुनि लाजावें शेर्मेनें ॥ ६७

त्रिजटा:- मात हे दिव्यालंकार व हीं अमोल्य वस्त्र भूषणें परिधान करावीं.

सीता:- अहा हीं बिभीषणांनीं पाठविलेलीं दिव्य वस्त्र भूषणें त्याच्या भक्तिस्त- व ग्रहण करतें (परिधान करिते.)

विदुषक:- सूत्रधारा " एकनूर आदमी तो हजारनूर कपडा, लाखनूर गहि- ना और कोटनूर नखरा;" हें अगदीं खरें आहे पहा आतां ही सीताबाई क- सें झळक फळक प्रकर्ण दिसत आहे ह्रिच्याकर्णी सूर्य मंडळातुल्य सतेज अ- शीं दिव्य तारकें सुशोभित दिसत आहेत. यारत्नखचित डागडागीण्यांचा च मचमाट प्रळय विजेहूनही विशेष आहे असें वाटतें, यास्तव त्रिभुवनीं ही दु- र्लभ अशा भासतात, हिनें आपल्या विशाळभाळीं कुंकुम तिलक लावून त्याच्या खालीं अत्युत्कृष्ट कस्तुरी रेखिली आहे तेणेकरून ह्रिचा मुखेंदु पूर्ण चंद्रास लाजविणारा दिसत आहे, अरे मी कितीतरी वर्णन करूं, हें देदीप्यमान स्वरू- प पाहून मला अत्यानंद होत आहे, सारांश या सालंकार दिव्य तनूची कांती दशदिशांस फाकून गेली आहे बाबा, नाहींतर आमचें थरकूर काय ध्यान दिसतें कीं पहातांच पळून जाऊन देशांतर करावेंसें वाटतें.

सूत्रधार:- चालू विषय सोडून स्वपत्नीचें एकाएकी वर्णन करावयास लागला- स हें काय?

विदुषक:- अरे मी आपली उगीच तुलना करून पाहिली आमची प्रियपत्नी जेव्हां का खोट खुरासणीच्या तेलानें थोबाड सारखून डोळ्यांत काजळीला दीग लोटून देते व मेणांत कोंद कोंदून कुंकाचा मळवट भरिते आणि धश्यारवशा लुगडें नेसते तेव्हां काय हे डंबीर्नीच वर्डीलम्हीण आहे कीं काय? असें चिंतो- पंनाम वाटतें, असो कोठवर सांगावें? सारांश हा नकतराव जेव्हां तयार होतो आणि तशांत एकांतीं प्रीयकर चुंबन घेण्याचा प्रसंग येतो तेव्हां आतां कथ- न केल्या प्रमाणें स्वरूप पाहून व तें हिरवें पिवळें राजीव नेत्र देखून आ-

१ धुतळ = सन्मानपूर्वक १ कळिलें.

कारी वाईस आमची भेट घेतल्या वांचून रहावत नाहीं.

सूत्रधार- (पोट धरून हंसतो) काय मुलगा आपल्या घरची गुह्य गोष्ट चौघांत विनाकारण आणावयास कांहींतरी यास लाज वाटत आहे काय?

विदूषक- अरे असें लाजूं लाजूं केलें असतें तर नाटक पण नाटकच असतें.

त्रिजटा- हे सार साक्षी, जानकी, मी या दिव्य फलादिकें करून तुझी ओंटी भरतें हिचें गृहण करावें.

सीता- (ओटींत घेते) हीं आस्वादवत अमृतफळें बहूत सुंदर आहेत.

शर्मा- बाई, आदिमाये, हीं त्वां भक्षण करावीं.

सीता- (मारुती, बिभीषण, त्रिजटा, शर्मा, इत्यादिकांस एक एक फळ देवून एक आपण भक्षिते आणि मुख प्रक्षालन करिते.)

बिभीषण- (त्रिभुवनैक मोल मणि सीतेपुढें ठेवून) हे जगन्माते माझ्या ज्येष्ट भ्रात्यानें हा सुंदर मणि सदनीं ठेविला होता तो आपल्यास मी मनोभावें करून अर्पण करीत आहें याचा स्वीकार करावा.

सीता- (फार चांगलें आहे (गळ्यांत घालते)

बिभीषण- मारुती- (सीतेचे चरणकमल वंदून) हे स्वामिनी

साकी.

रत्नजडितस्या शिबिके माजी चलाबसोनी माते ॥
पोंहोंचवाया तुज लंकेची सर्वहि सेना येते ॥ ६८॥

अठरा क्षोणी प्रबळ वाद्ययंत्री वाजावयास लागले आहेत लंकेची सर्वसेना पोहोंचवावयास येत आहे तर माते या रत्नजडितशिबिकेंत बसून चलावें आम्हीं आपल्या चरणसेवेस तत्पर आहोंत.

सीता- (शर्मा आणि त्रिजटा यांच्या कंठीं मिठी घालून) प्राणसख्यांहो पुढें तुमची व माझी भेट केव्हां होईल बरें?

शर्मा व त्रिजटा- (आपल्या कुरळ्या केंसांनीं जानकीचे चरण झाडून नेत्रांस पाणी आणून) हे प्राणसखे, राम ललने, आम्हां दीन किंकरींस त्वां विसरूं नये

सीता- खरेंच तुमचे असतीम महदुपकार मी कधींही विसरणार नाहीं तुम्ही स्वस्थ सुखी असा (सीता पालखीत बसते)

पालखीत

विदुषक:- सूत्रधारा, अरे ह्या देदीप्यमान पालखींत बसून मोठ्या थाटानें को-णाचें प्रकर्ण चाललें आहे रे शिबिका भरजरी किनखापानें आच्छादिलेली आहे जसा रत्नपारखी अमोल दिव्यरत्नें पेटींत घालून मोठ्या तजविजीनें राखतो किं-वा संतलोक स्वहृदयस्थ आत्मज्ञान अज्ञानापुढें सहसा न आणितां तें तसेंच अंतरीं सांठवितात किंवा कृपण पुरुष निजधनास गुप्तपणें रक्षितो तद्वत् हें बडें प्रकर्ण मोठ्या तजविजीनें चालविल्याचें दिसतें. मारुतीराव आ-पलें पुच्छ उभारून सव्यभागीं चाललेच आहेत. बिभीषण वामभागीं चालला-आहे पुढें असंख्य सेना एकसारखी मोठ्या थाटानें जयजयकार शब्द पुकारीत चालली आहे नाना परीचीं जयवाद्यें झडून राहिलीं आहेत, तेव्हां हें आहे तरी काय?

सूत्रधार:- अरे ही जगन्माता सीता स्वेलाचलीं रामाकडे जात आहे.

विदुषक:- वाहवारे स्वारीचा थाट !!! वारे वः यौं, याचेंच नांव गम्मत आमची बायको नर कधींच अशा थाटानें आमचे भेटीस येत नाहीं. याचें कारण काय?

सूत्रधार:- अरे तुझ्या स्त्रीची आणि सीतेची बरोबरी आहे काय?

विदुषक:- कांबरें असें कां म्हणतोस? आमची काय हेडंबा आणि ही काय गोडं-बा आहे काय? हिला काय दहापांच नाकें आहेत.

सूत्रधार:- बहावा हा दिवस जिकडे शिरेल तिकडे शब्द वळवाच्या पावसा प्र-माणें वाग्जल्पना कोसळील (स्वारी स्वेलाचलीं प्रवेश करिते.)

---


## प्रवेश ५

स्थळ

### राम आश्रम

पात्रें

| | | | |
|---|---|---|---|
| राम | दशरथनंदन | वानरगण | रामसेना. |
| सीता | रामपत्नी | बिभीषण | रावणाचा बंधु |
| मारुती | रामदूत | इंद्रादी देव | सुरसमूह. |



मारुती, बिभीषण:- (रामास वंदून) हे राजीवाक्षा श्रीरामा त्वदाज्ञेनुरूप आमची माता सीता आणली आहे.

वानरगण:- बा रामा आम्ही तुझ्या चरण रूपेस्तव रानोमाळ हिंडलों व कसकसे कष्ट सोसले हें तूं उत्कृष्ट स्पष्ट जाणत आहेस आरंभिलेलें कार्य तुझ्या प्रताप बळें करून सिद्धिस गेलें. परंतु जिच्याकरितां इतकी खटपट केली ती सीता सती अद्याप आमच्या दृष्टीस पडली नाहीं इतकेंच नाही तर उलट तें नेडे मुकडे राक्षस गण आम्हांस यथास्थित मुष्टिमोदक बक्षीस देतात. तेव्हां हीच काय शेवटीं देणगी! तुमचें काम झालें आतां आमची कशाला गरज असेल! ठीकच आहे "गरज सरो आणि वैद्य मरो" वाहवा "तुम्ही आम्ही एक आणि कंगाळिला मेरव." असें कसें बरें!

राम- बिभीषणा तूं आपल्या सेनेचा चांगला बंदोबस्त ठेव हे माझे परम मित्र वानरगण दुःखी झाले असतां त्यांत मला कोणतेंही सुख नाहीं, मी त्यांच्या भक्ति स्तव ऋणी आहें.

बिभीषण- (वेत्रपाणीस निवारून) अहो महाराज या वानरांनीं पालखीसं निध अतिशयगर्दी करावी दुरून डोक डोकावून पहावें, पुच्छें उभारून अपूर्व नमस्कार करावें, मला त्यांस असें न करण्याविषयीं कधीं कधीं वाटेने निवारावें लागलें.

राम- हे वायुनंदना पालखीवरील अच्छादन एकीकडे सारून ती जनकबाळी सर्वजनांस अवलोकूं द्यावी.

मारुती- (पडदा सारून) हे मित्रहो त्रिभुवनपतीची रत्नखाणी राणी पहाण्याची शिराणी सर्वांनी यथेच्छ पुरवून घ्यावी.

वानर- (विस्मित होऊन) आपआपल्यांत, हिचें मुखकमळ चंद्रकांतीहून सुंदर दिसत आहे भोंवया धनुष्याकार आहेत नयन कमलें विलोल मृगशावाक्षासम भासत आहेत. नासिकाचे सरळत्वास चंपककळीची उपमा साजेल असें वाटत नाहीं. मस्तकाचे कोंकुरळे केंस शिखावर्णास अजिंक्य आहेत अधर ओष्ठ जणु दिव्य पोंवळींच भासतात. कुंकुम विराजित भाळ अत्युत्कृष्ट शोभायमान दिसतें, कर्ण कुंडलें चंद्र दिवाकरासम झळकत आहेत. परंतु उर्वरित शरिरावयव दिव्यांबरें आच्छादित असल्यामुळें त्याविषयीं कसेंकाय आहे तें सांगवत नाहीं.

राम- (अंतर्भाव जाणून) कां मित्रहो तुमची इच्छा परिपूर्ण झाली कीं, नाहीं?

वानरें- होय पण सीता माईनें मस्तकावरून पदर घेतला आहे आणि बहुतेक शरीर भाग वस्त्रालंकारें करून आच्छादिला आहे या मुळें तिला आमच्या सारखें पुच्छ वगैरे अवयव आहेत किंवा नाहींत हें समजत नाहीं.

राम- मारुती, त्यात्रिष्कपटी मित्रांच्या नयन तृप्त्यर्थ जानकीस न लाजण्या विषयीं सांगावें.

मारुती- (सीतेस वंदून) मातुश्री श्रवण करावें.

आर्या.

पदरानें सारूनियां दावा हा अंग आपुलें कपिनां॥
श्रीरामाज्ञा पुरवा चित्तीं आणून कां कीं हा नयना॥ ६९

**सीता:**— (सलज्ज मुद्रेनें) मारुनी पतीची आज्ञा भंग न करणें हाच आमच्या स्त्रियांचा मुख्य पातिव्रत्य धर्म होय (तसें करिते.)

**वानर:**— अहाहा ही जगज्जननी अनिर्वाच्य स्वरूप आहे; परंतु आपल्यांत हिच्या शरीर रचनेंत पुच्छा वांचून बहुतेक सादृश्य आहे, हें असो पण ह्या विषयीं आपण राम भाऊस विचारूं.

**राम:**— (वानरांचा मनो भाव समजून) मित्र हो मनुष्य जातीच्या प्राण्यांस ब्रह्मदेवानें पुच्छ निर्माण केलें नाहीं तें जरी असतें तरीं ह्या रचनेस सुशोभित दिसतेंच ना, समजलांत?

**दुष्टजन:**— (मनांत) अहो या अनुपमेय सुस्वरूप सुंदर सीतेस तो दुष्ट दशकंधर षण्मास पर्यंत उगाच कसा राहूं देईल? यास्थळीं कांहींतरी घोटाळा होण्याचा संभव नाहीं काय?

**राम:**— (सर्वांतर जाणून व्यंकट भ्रुकुटी करून) सीते मी त्या दुष्ट रावणास मारून तुला सोडवून आणिलें; परंतु तूं तेथें षण्मास होतीस यामुळें सकल जन मन साशंकित झालें आहे यास्तव मन मानेल त्या वाटेस तां जावें उरावरील पाषाण उतरल्यावर किंवा राग गुल्म विरून गेल्यावर अथवा जन्मांधास दिव्य नयन प्राप्त झाल्यावर जसें सुख प्राप्त होतें तसें माझें एक वचन व्रत शेवटास गेल्यामुळें मला सौख्य वाटत आहे. आतां तूं क्षणभर ही येथें उभी राहूं नको. तुला पाहिजे तिकडे जाण्यास दशदिशा मोकळ्या आहेत पहातेस तर खरें कीं, मी सर्व संग परित्याग करून उदासपणें अघोर काननांत स्वेच्छाचारी विचरत आहें माझ्या मनीं कोणतीही कामना उरली आहे असें समजूं नको तुला पाहिजे तर तूं भरताला एखादा नृपनाथ वरावा. मला कैकेयीनें जेव्हां अरण्यवास करण्याची आज्ञा दिली तेव्हांच मी तुला मज संगें न येण्या विषयीं पूर्वींच निषेधिलें होतें असें असून तूंच हट्टानें आलीस अगे, मी राज्योपचार त्याग करून वनचरांशीं मित्र केलें, वल्कलें धारण करून कंदमुळें सेवन करून रहातों, तृण शय्येवर शयन करीत असतों याकरितां सीते तुला माझ्या सं-

१ न्याय

गतीनें काय रूख आहे बरें? सकळ उपाधी टाकून या अघोर कांतारीं निरंजनी येऊन राहिलों आहें. प्रपंच व्यसनाचा त्याग केल्या सारखेंच झालें आहे. तस्मात् व्यर्थ कष्टी न होतां म दृष्टी सन्मुख उभी राहूं नको, चल जा येथून नीघ (असें म्हणतांच.)

सीता- (कर्दली स्तंभवत् धरणीवर आंग टाकून) शिवशिव शिव हे जगन्निवासा या दीन दासीवर दुःखद शब्दरूप कस्यांत बीजा कशा बरें एकाएकी कोंसळल्या? या शब्दरूप सांडसांनी माझें हृदय खंडित केलें. हे वाग्बाण अकस्मात टोंचत आहेत (गहिंवरून) हे धरणी माते जसी कुमुदिनी सूर्यनारायणाच्या प्रचंड किरणांनीं करपून जाते तद्वत माझी अवस्था झाली आहे (अश्रुपात होतात) हे जगद्वंद्या राजीव नेत्रा, आनंद कंदा, गुणसमुद्रा श्रीरामा आपल्या वियोगवन्हीनें षण्मासपर्यंत मला जाळजाळून घेतलें असा पूर्व कर्म गहन म्हणून तें महान विघ्न टळून मला त्वच्चरणाचा लाभ पुनरपि प्राप्त झाला. हा आनंदाचा दीन उगवला असें समजून मी परम समाधान मानीत होतें. परंतु कर्माचि गति अनिवार आहे जगदीश्वरा.

साकी

कामधेनुची धार कादितां पात्रीं चिक शेराचा
आला असतां काय करावें विपरित खेळ विधीचा ॥ ७०
क्षुधा प्राशनीं दुर्धर विष सम झाला जर परिणाम ॥
दोष कुणाला द्यावा तरमग त्यागी मज कां राम ॥ ७१

आर्या

मत्तनु लोह परि जरी गणिली तरि रामचरण परिसाची
हृदयगमे ससंगति घडुनी झाली कशी न कनकांची ॥ ७२

माझ्या प्राणप्रिय श्रीरामाकडून असा अद्भुत प्रकार कधींच व्हावयाचा नाहीं, असें असतां हें मद्दैव कसें ओढवलें बरें? कालत्रयींहीं ही गोष्ट ध्यानींमनीं स्वप्नीं येण्याजोगी नव्हती ती एकाएकी कशी प्राप्त झाली.

---

१ त्रै म्हणजे स्वाचा २ अन्नृत ३ मांस शरीर ४ सोन्याची

साकी.

मृगेंद्र[1]रक्षक असतां जंबुकें[2] त्रास कसा मज देतो
खगपत्याश्रय असुनी अहिंचा डंख कसा चालेतो ७३

दिंडी.

सुरतरूच्या छायेंत मी बसोनी॥ कोणताही अन्याय तो नसोनी॥ मज मारी तो राग मनि धरोनी॥ दुष्ट दैवाची कैसिही कहाणी॥ ७४॥ रामपद लीलावारिधींत मीन॥ असुनि मी कां मज ठाव ही मिळेना॥ जाउं कोठें हो राम कृपाकाश॥ कोपलेंसें कां केपु सावकाश॥ ७५॥

मला नरबाई शब्द अग्नीतून निघून कुपांत्यांत पडल्याप्रमाणें झालें आहे, अगबाई, इकडे आड आणि तिकडे विहीर व मध्यें मी अशी अवस्था झाली आहे. हे प्रभो दीनदयाळा (कपाळावर हात ठेवून) माता आपल्या स्वबालकास विषपान करवील, किंवा पिता प्रियपुत्र त्याग करील अथवा धनी स्वसेवकास निष्कारण दंडील तर तेथें त्याचें काय चालणार आहे त्रिभुवनपतीचा चरणाश्रय सुटला तर मी कोणास शरण जावें? मी आणि राम हे अर्धांगी असतां आज अकस्मात त्यांनीं माझा कां बरें त्याग केला? सूर्य किरणावर कोपेल, समुद्र लहरीशीं दावा करील, अमृत आपली मधुरता सोडील, कल्पवृक्ष स्वशाखेसीं अबोला धरील. तर त्याचा दोष कोणास लावावा बरें? भागीरथी किंवा अग्नि जसें निजांगीं शुद्ध आहेत तशीच मी या अशोकवनामध्यें शुद्ध रूपें दिवस काढीत होतें, ध्यानीं, मनीं, स्वप्नीं देखील रामचरण विमल कमळाच्या निजध्यासा वांचून मला या दीन दुबळीला कांहींच कोठें माहीत नाहीं. मीनहरी दलस्था अन्यायास्तव मेरू इतका दंड व्हावा काय? आईग जी कमळिनी यत्किंचित् मंद वातें करून देखील थरथरां कंपायमान होऊन पडणार तिला वज्रघात कशास पाहिजे? परमेश्वरा आतां माझी तुला सत्वर करुणा येऊं दे या गोष्टीस माझा काय उपाय आहे बरें? विना कारण दुष्ट जन मजवर गहजब करतील तर फारसेंच करे.

---

१ सिंह २ कोल्हा ३ गरुडाश्रय ४ सर्पाचा ५ कल्पवृक्षाच्या ६ समुद्रांत ७ मत्स्य

त परंतु हे सर्वेशा सकल चित्तचालका तूं सर्व जाणत आहेस. ही दीन धेनू चिखलांत गुंतली इजला तुजवांचून कोण बरें बाहेर काढील, असो अरे वानरानों रामभक्तांनों आतां मध्या मी पेरवून एक महान अग्निकुंड तयार करा त्यांत मी जर शुद्ध नसेन तर जळून खाक होईन. जर शुद्ध असेन तर जगदाधिपती मत्प्राणपती जो श्रीराम त्याच्या चरणकमलीं भृंगी होण्यास पात्र होईन.

**वानरें:-** (रामा सन्मुख येऊन) रामा हा अघोर विलाप ऐकून आमचीं हृदयें तर दुभंग झालीं आहेत आमची आई आतां दिव्य येईल म्हणते, हा घोर अनर्थ परम दुःसह आहे, बा रामा आमच्या मातेस दुःख देऊं नये तिनें तुझें काय केलें बरें?

**राम:-** नाहीं नाहीं जनापवाद असून त्या दुःखाहून ही मला अत्यधिक वाटतो. यास्तव मित्रानों, तुम्ही या कामांत उगीच ओढाताण करूं नका, ती दिव्य घेत असल्यास सत्वर थोर अग्नि सिद्ध करा म्हणजे सत्यमिथ्य कायतें आतांच दृष्टिगोचर होईल. हातच्या कांकणास अरसा कशास पाहिजे. पाहूं काय होतेंतें?

**वानरें:-** (अश्रु वहातात) आई माते या समयीं तुझ्या पुढें बोलावयास आम्हीं समर्थ नाहीं आपल्या पूर्वोक्त आज्ञे नुसार महान अग्नि सिद्ध केला आहे

आर्या.

ज्याच्या ज्वाला जाती आकाशीं अग्नि तो असा केला
हा उनि तटस्थ नयनीं सीतेची निरखिती तदा लीला॥७६

**सीता:-** (रामाकडे दृष्टी भरून पहाते) आणि अग्निसान्निध्य जाऊन कुंडास त्रिवार प्रदक्षिणा करून गळ्यांतील सुमनहार त्यास वहाते; व

साकी.

सत्य सत्य मी शुद्ध नसे जर तरि मज अनलो जाळ
जनापवादा परीस बरवा ऐसा भंनेः काळ॥७७

---

१ अग्नि २ प्राणोत्क्रमण समय.

हे अग्निनारायणा, खरोखर कोणतेंही पापाचरण मी स्वप्नांत देखील अ-व लोकिलें नाहीं असें असतां यात्रिविधतापजनांच्या माऱ्यांत मी सांपडून परम विव्हळ होत्साती दिव्यघेत आहे. तर दुधापाण्याचा निवाडा करणें तुजकडे आहे. या प्रसंगीं मला अधीक बोलवत नाहीं, सर्वस्वीं तूं आहेस (राम, राम, राम असे त्रिवार म्हणून अग्नींत उडी घातली.)

**विदूषक**- अरेरे, हें कशाचें बाबा नाटक? येथेंतर माणसें बळी जातात अरे ज्या सीते करितां रामाचें व रावणाचें अंघार युद्ध झालें तिचा परिणाम असाच्हा वाकीं काय? पृथ्वी आपली कन्या भाजली म्हणून थरथर कांपत आहे. जिकडे तिकडे एकच अहःकार झाला आहे, सकल ऋरवृंद व कपिगण या महान् अघटित कृत्यानें शोक निमग्न होऊन मूर्छागत पडले आहेत काय हा प्रळय काळतर नाहींना? धुराचे कल्लोळ चालले आहेत, या महान अग्नि तापें करून सप्त समुद्रांस कढ आला आहे. वैकुंठ कैलासादि महान स्थळें डळमळून गेलीं आहेत. आकाशही सकंपसें दिसतें अपार नक्षत्रें रिचवताल हाय हाय हा काय कहार !!! बाबारे आजपासून अशा नाटकांत येणें आणि सास्तर खाणें बरोबर आहे, अरे हे एक प्रकारचें सती जाणेंच म्हणावयाचें, सती न जाण्याचा कायदा करणारे विलायती विद्वान गडी ह्या वेळेस कोणीकडे पळाले होते.

**सूत्रधार**- अरे या वेळेस सर्व लोकांच्या मनाची स्थिती अति दुःख भरित झाली असेल यांत संशय नाहीं परंतु हा लीला प्रकारच तसा आहे बाबा तुं आपला अचाट विजातीय कल्पना बळेंच खेंचाटून आणून पेचांत पडूं नको.

**विदूषक**- वाहवारे सूत्रधारा, हा तर शब्द तोंडधरून बुक्याचा मार झाला कांहीं तरी दुःखांश कमी व्हावा म्हणून मी कधें बोलतों तें तुम्हांस कुधें कसें लागतें? बरेंतर नेरेचिचुप् मेरेबिचुप् आय आपला झेणास्पिक् होनो. आळी माळी जीभ काळी, वेल, तर, मग पुढें अच्छा तरेसे चलनादेव.

**मारुती वगैरे सर्व कपिगण** (ढळढळां अश्रु वहातात.) माते आम्हां बाळकांस टांकून तूं गेलीस ना? काय ही आमची कर्मरेषा? कसें करावें आमचें जीवन व्यर्थ आहे तुझें चरण कमल आम्हीं केव्हां पाहूं? तुला महा काळानेंही

भय नसून हा काय प्रकार झाला हरहर ईश्वरा, आमची मातुश्री आम्हास लौकर भटूंदे (इतक्यांत मोठा चमत्कार होतो.

श्लोक.

पृथ्वीवृत्त.

नदा अनल गुप्त ती सतिवरी निघूं लागली
दिसे नवतनू प्रभा रविसमान ती चांगली ॥
त्रिविष्ट पिंहि माईना जनमनोद्भुता नंदती
चरित्र कथवेनतें कविजनां क्षमा मागतों॥ ७८
(सीतादिव्य स्वरूपें अग्नि बाहेर येते.)

वानरें:- अत्यानंदानें सीता चरणाब्ज वंदून उड्या मारितात) अहाहा, भूप,भूप, आली हो आली आमची आई आली, मातेच्या अद्भुत लीलें करून आम्हांस परमानंद झाला तो आमच्यानें वर्णवत नाहीं हें स्मरण न भूतो नभविष्यति, माते तूं धन्य धन्य आहेस

बिभीषण:-(सीता चरणी लोटांगण घालून) अहाहें विलक्षण अगाध नवल पाहून जो अत्याल्हाद प्राप्त होत आहे त्यास उपमा देण्यास कोणताही पदार्थ स्फुर्तिकसा दिसत नाहीं रावणानें व्यभिचार केला नाहीं हें हीं यांत सर्वांस दिसून आलें, त्याचा तरी मी आनंद कां न मानावा?

सुरगण:- (वंदून) धन्य धन्य हे जनक नंदिनी तूं धन्य आहेस, हा तुझा अगाध महिमा भक्तजनास भवांबुधीतून पार पाडावयास आधारच झाला आहे.

साकी.

सुर नर सर्वहि सीतेवरती सुमनाचे संभार ॥
द्वार्किनि वदती सुगति मदही लीलानंद अनिवार ७९
असंख्य दुंदुभि धोंधों करणें वाजंत्र्याचा बाजा ॥
वाजे गाजे त्रिभुवनिं कीर्ती धन्य रघूत्तम भाजा ॥ ८०

---

१ सीता २. त्रिलोकी. ३ पुष्पवृष्टी. ४ सीता.

(आप आपल्यांत म्हणतात) अहो ठीकच आहे हें भावीकृत्य मनांत आणू-न सीतेनें पूर्वीच आपलें दिव्य स्वरूप रसेंत गुप्त ठेविलें होतें तेंच आतां दिव्या-चें मीष करून प्रगट केलें, रामाची दिव्य कांता सीता रावणांच्या हातामध्यें गेली ह्या केवळ पोकळ वार्ता आहेत. असें कोणी त्याला वेदांतांत पाहील तर त्यास धा-दांत समजून येईल, कीं, छाया रूपानें सीतेनें ही अप्रतीम माया दाखवून स-गुण मायास्तव कौतुकमात्र करून दाखविलें हें खरें.

साकी

सीतास्वरुपा पांवक घेउनि दशास्य कानेन जाळी

दिव्य मिषानें स्वरूप घेऊनि आली मैथिलबाळी ॥ ८१

सीताः- ( अवर्णनीय अत्यानंदानें )

साकी.

हंसगतीनें शुद्ध मतीनें सीता रामापाशीं ॥

येतां उठला रघुपति तोषें स्वरथर जो गुणराशी ॥ ८२

श्लोक

श्रीरामाननदेखुनी निजस्वरवीं ह्हिंगता पावली

सीतानें करुनी स्वहास्यवदना घालीमिठी पाउलीं ॥

देई क्षेमनिला धरोनि ह्दयीं कोदंड पाणी स्वयें

वामांकावरि बैसवी नवलहें वर्णावयानें नये ॥ ८३

श्लोक

श्रीरामतें दिसतसे नव मेघरंग ॥

विद्युल्लता गमत जानकि ती अभंग ॥

झाले स्वरास्वर अमूप मनांत दंग ॥

लीहो अम्हां वदाति रामपदाब्ज संग ॥ ८४

---

१ अग्नि (हाच जसा सीता रूप घेउनी.) २ रावण हेंच कोणी रान. ३ जनक नंदिनी (सीता) ४ श्रीराम ५ वीज. ६ भास होतो.

शंकर:- हे पुराण पुरुषा, सुखधामा, श्रीरामा

श्लोक

आनंद कंद रघुनंदन पूर्ण साचा ॥ जो ईश पालक असे सकलां जिवांचा ॥ मर्दावया असुर घे विविधाव-तार ॥ हें त्यांत दीसत चरित्र सुसार सार ॥ ८५ ॥

हे सच्चिदानंद, युगायुगीं त्वां दुष्टअसुरमर्दनार्थ नानाविधावतार धारण केले परंतु हें चरित्र अगाध झालें, त्वन्नामें करून मत्कंठगत हलाहल विष सकल शांत झालें, असा जो तूं त्या तुझे दर्शनें करून मला अत्यानंद प्राप्त झाला, असो, आतां सीते सह वर्तमान अयोध्या पुरीं गमन करावें.

राम:- हे अनादि सिद्धा विश्वंभरा, कैलास नाथा, आपण माझें अराध्य दैवत अहांत आणि ही सर्व करणी आपलीच आहे, ब्रम्हांड दग्ध करण्याची शक्ती ज्या हलाहल विषाच्याठायीं होती तें आपण स्वकंठी धारण करून लोकरक्षण केलेंत तस्मात् मी कांहीं आपल्या वेगळा नाहीं.

ब्रम्हदेव:- हे क्षीराब्धिवासी, भव भंजना तुझ्या नाभिकमळा पासून मी उत्पन्न होऊन सृष्टी निर्माण केली त्यांत रावण कुंभकर्णादिक अनेक क्रूरासुर मदोन्मत्त होत्साते अति दुष्ट कर्म करूं लागले तेणे करून धर्म ऱ्हास होऊं लागला या संकटास्तव युगा युगांच्या ठायीं आपण नानाविधावतार घेऊन धर्म संस्थापना केली तोच पुराण पुरुष तूं राम आहेस जनकाज्ञेचें मीष करून अरण्यवास करून सीता निमित्यें रावणास वधून निजभक्तांचें संरक्षण केलें, तो तूंच हा श्रीराम हें मी समजून आहें.

राम:- हे ललाट पट्ट लेखना, ब्रम्हदेवा, तूं कथन करतोस ह्यांतील गुप्त रहस्यें तुला व मलाच माहीत आहेत आपण उभयतां अभेद अहोंत.

इंद्र:- हे ब्रम्हानंदा, परात्परा आम्हां सर्वांस आपण बंध मुक्त केलेंत हा महद उपकार झाला, या दासास कांहींतरी सेवा सांगावी.

राम:- हे सहस्राक्षा, तूं समरांगणी ऐन वेळेवर दिव्य रथ पाठविलास तेणेंच

१ [illegible] म्हणजे वरुआहे जात असें चरित्र.

रून जय प्राप्त झाला हाच तुझा मजवर उपकार आहे.

**इंद्र-** हे अयोध्यानाथा आपल्या प्रसादें करून आम्हांस स्वपदीं स्थिरत्व प्राप्त झालें. चकोरांनीं चंद्रास, चातकांनीं मेघास कोणत्या गुणें तृप्त करावें? क्षीराब्धीस नक्र समर्पण करणें, किंवा कुबेरास कपर्दिका नजर करणें जसें तसेंच मी रथ पाठविला म्हणून आपण उपकार मानितां हें मला नवल वाटतें (चरणालिंगन देतो).

**राम-** कित्येक वेदशास्त्र संपन्न जनांनीं धर्माधर्मांची निवड करून अनेक सार गोष्टी सिद्ध केल्या. त्यांत मुख्य हें कीं, "परोपकाराय पुण्याय पापाय परपीडनं" हाच मुख्य श्रुत्यार्थ हेतू होय तर असा हा परमोपकार वानर गणास घडला. त्यांनीं मजकरितां समरांगणीं आपले प्राणही वेचिले याहूनअधिक काय सांगावें, त्यांचीं कुटुंबें आप्तजनादि इष्टमित्र शोकार्णवीं बुडून गेले असतील, यास्तव ते माझे सर्व वानरगण त्यांस पुनः त्वां जीववावें

**इंद्र-** महाराज आपल्या आशिर्वादें करून ही सेवा सिद्धिप्रत पावो, (क्षणार्धांत सर्व वानरें उठवून रामचरण वंदितो

### श्लोक

**इंद्राज्ञे करि वृष्टि त्या कपिवरीं पीयूष मेघावली॥ तेणें वानर मंडळी सकळही जीवंतता पावली॥ कौसल्यात्मज भक्त ते मरणत्यां येणार हो कोठुनी॥ हेतू हा धरुनी मनीं समजुनी घ्यासार तें साधुनी॥ ८६॥**

**वानरें-** (रामास वंदून अत्यानंदानें) अहाहा हे जगत्पित्या, अनाथ नाथा, रघुश्रेष्ठा, त्वच्चरण कृपेनें आम्हीं पुनरपि जीवित पावलों असोच या दीन भक्तांवर सदां सार्वकाळ आपली पूर्ण कृपा दृष्टी असावी.

**विदुषक-** अरे सूत्रधारा या प्रसंगीं मला एक शंका येते ऐकशील तर जिव्हा आकास प्रस्थान ठेवण्यास सांगतो.

**सूत्रधार-** बरें आहे पडूंदे तर खरी एकदांची शिंपली बाहेर मोती, गळूं द्यानर खरा तुमचा मुखरस, होऊंच द्यानर तुमचा मुखगत घंटानाद.

---

१ अमृत २ समूह.

**विदुषक**:- अहो या रणभूमीवर युद्धांत कित्येक वानरें आणि रजनीचर पडले होते. असें असून अमृतवृष्टीनें वानरेंच कशीं उठलीं आणि राक्षसांचे काय झालें (सभेकडे पाहून) कांमंडळी या हरिपानें आतां सूत्रधार रावजीना कशी घोंटाळ्याची होंटाळी दिली आहे ते समर्पक प्रत्युत्तर देतील तरच ऐकावें नाहींतर मग ते कसें ऐकायाचें हें उघड होईल.

**सूत्रधार**:- अरे, तुझाहा शेवटचा वाग्बाण वर्माचे वर्म भेदन करीत आहे असो श्रवणकर, अमृतवृष्टीच्या पूर्वीच श्री शंकराचें भूतावळीनें राक्षसांची प्रेतें मात्र भक्षण केलीं होतीं, कपींचीं कलेवरें तसींच होतीं म्हणून तीं जीवित पावलीं समजलास.

**विदुषक**:- (मान डोलवून) वहावारे चतुरस्त्र वक्त्या आतां माझी पूर्वोक्त शंका शिलक राहिली नाहीं म्हणून पावती देऊं काय? चालूंदें तर पुढें काय असेल तें.

**राम**:- (सप्रेमानें) हे लंकाधीशा बिभीषणा, आतां आम्हांला आज्ञा द्यावी, आणि त्वां स्वनगरीं गमन करावें, आम्ही अयोध्यापुरीचा मार्ग धरतों.

**बिभीषण**:- (परम गहिंवरून) हे भक्त कामदा, श्रीरामचंद्रा, मला टाकून जातां काय? लंका सदृश अनंत राज्य स्यानें आपल्या सत्स्वरुपा वरून ओंवाळून टाकावीं. आपल्या भजनावरून मोक्षादि मुक्तींचें लिंबलोण करावें असा आपला चरण कमल सेवा तत्परतेचा मद्दानंद त्यागून लंकेचें राज्य करण्यांत कांहीं सुख असेल असें नाहीं मला आपल्या संगें अयोध्येस येऊन तेथें सेवा करून राहण्याची आज्ञा असावी.

**राम**:- (आलिंगून) हे परम भक्ता तुझ्या हृदय कमलीं माझें सदोदित वसतिस्थान आहे, बरें अयोध्येस चल तेथील सुख सोहळा पाहून नंतर लंकेस जा आतां पुष्पक नामक विमान सत्वर आणावें.

**बिभीषण**:- विमान आणवून) हे दीन पालका, श्रीरामचंद्रा, विमान सिद्ध आहे अहाहा कितीतरी हें उत्कृष्ट आहे.

### श्लोक.

(शार्दूल विक्रीडित.)

सोमाभेहुनि भासते अधिक ही यानप्रभा साजिरी ॥ देखा कंदरशा विराजति बहू मोत्यांचिया झल्लरी ॥ रत्नें दिव्य अमोलहीं दिसतिजीं सिंहासना जोडलीं ॥ संकोचें आणि विस्तरें बहुत तें इच्छा करीतां भली ॥ ८७ ॥

राम= विमानास वंदून सीतेचा कर धरून) अगे आतां आपण ह्या रत्नखचित सोपान मार्गे दिव्यविमानी सिंहासनारूढ होऊन अयोध्येप्रत गमन करूं. (उभयतां विमानारूढ होतात.)

साकी.

लक्ष्मण अंगद व्यजनें वारिति सीता रामावरती ॥ अष्टादश ते महा क्षौणिनें वाजंत्रीं वाजती ॥ ८८ ॥

विदूषक= यौरे काय थाट !!! छपन्नकोटी गोळांगुळ अठरा पद्म वानरें, बहात्तरकोटी रीस या दिव्य व विस्तृत विमानारूढ झालेच आहेत, वाजंत्री झडतच आहेत, सीता व राम हे महदानंदें गुजगोष्टी बोलतच आहेत अष्टवसू काय अष्टकोनी उभे आहेत तेव्हां हें आहे तरी काय? सोंग!!॥

सूत्रधार= अरे हा प्रत्यक्ष त्रिजगदाधिपती श्रीराम जानकी सह वर्तमान अशा अनुपमेय थाटानें विजयी होत्साते अयोध्यापुरी गगन मार्गें गमन करीत आहेत त्यांस तूं सोंग कसें म्हणतोस?

विदूषक= अरे नाटकांत खरोखरच राम येऊं लागला मग काय पाहिजे हें. तर सर्व ढोंग आहे म्हणून त्यास मी सोंग म्हटलें त्यांत तुला इतकें अवघड कां वाटलें?

सूत्रधार= अरे आतां बडबडीची गडबड पुरे कर जे कोणी रामभक्त असतील त्यांस हा लीला प्रकार पाहून ज्याकाळीं साक्षात् ह्या गोष्टी झाल्या त्याचें स्मरण होऊन त्यांची भक्तिदार्ढ्यता पावणार नाहीं काय?

विदूषक= अहाहा, खरेंच असेंजर आहे तर कोणतीही अटक मनांत न आणितां बेधडक नाटक पहाण्यास सिद्ध असावें. हेंच सत्य.

---

१ चंद्र कांतीहून. २ विमानाची शोभा. ३ पसरे.

# रावण वध नाटक.

सूत्रधार- पहा या दिव्य विमानावर सुरनर सुमनें सुमनवृष्टी करीत आहेत जिकडे तिकडे आनंद सुखाची लूट होत आहे पुढें भरताची श्रीरामचंद्रास भेट होऊन सर्वांस अत्यानंद झाला आहे.

श्रीरामचंद्रार्पणमस्तु

ग्रंथाची समाप्ती

आर्या

श्रीसांबपदीं अर्पण करितो हा ग्रंथ बाळकृष्ण सुत
रावजि उपाभिधानें लेले ऐसें जनांत वदतात ॥ १ ॥

ओंवी

शके सत्राशें ब्याण्णवांत ॥ प्रमोदाब्दी श्रावणांत
गोकुळाष्टमीस हा समाप्त ॥ झाला ग्रंथ श्रीकृपें ॥ २ ॥

आर्या

वाल्मीका पुरिं असतां नारो आपाजि गोडबोल्यांनीं ॥
रावणवध नाटक हा ग्रंथ कराहें सुचविलें त्यांनीं ३ ॥
द्यावी त्यातें ईशें संतति संपत्ति आणि आरोग्य ॥
यास्तव गुणि पुरुषानें पावो वृद्धिंगता सदा भाग्य ॥ ४ ॥

---

ता० २० आगष्ट १८७०